# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार ९ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९६, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 96 Marathi - Daily - Mumbai, 9 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

शाळेचा पहिलाच दिवस अन् अचानक ७.८ रिश्टर स्केलचा भूकंप! फिलिपिन्स हादरलं

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


## थोडक्यात...

### काशीत मांस-मासळीची दुकाने शहराबाहेर हलविण्याचा निर्णय

**वाराणसी** - वाराणसी महानगरपालिकेने शहरातील मांस व मासळी बाजार शहराच्या हद्दीबाहेर पाच निश्चित ठिकाणी स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या नव्या बाजारांच्या उभारणीचे काम लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे. महापौर अशोक कुमार तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली टालन हॉल येथे झालेल्या महानगरपालिका सभागृहाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेने रामनगर, सुजाबाद, गणेशपूर, अवलेशपूर आणि शिवपूर या पाच ठिकाणांची नव्या बाजारांसाठी पहिल्या टप्प्यात निवड केली आहे. महानगरपालिका आयुक्त हिमांशू नागपाल यांनी सभागृहाला माहिती दिली की, या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ही ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. सध्या शहराच्या हद्दीत कार्यरत असलेली मांस व मासळीची दुकाने टप्प्याटप्प्याने या नव्या ठिकाणी स्थलांतरित केली जातील. बैठकीत नगरसेवक गुलशन अली यांनी हा मुद्दा उपस्थित केला.


जुने ते सोने

50 वर्षांपासून प्रसिद्ध !

धौती-योग

चूर्ण व टॅबलेट्स

9422011723

www.dhoutiyog.in


### मुंबईत खासगी पाणी टँकर संघटनेचा बेमुदत संप सुरू

**मुंबई** - मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील साठा केवळ १३ टक्क्यांवर आल्याने महापालिकेने १० टक्के पाणी कपात लागू केली असतानाच मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने आजपासून बेमुदत संप सुरू केला. त्यामुळे पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केंद्रीय भूजल पान ७ वर

# पाकिस्तानी कर्णधारासोबत जय शहांचे हस्तांदोलन

## क्रिकेटप्रेमी संतप्त! नियम फक्त खेळाडूंनाच का?

■ लंडन



**इंग्लंडमध्ये १२ जूनपासून महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी झालेल्या एका औपचारिक कार्यक्रमात आयसीसी अध्यक्ष जय शहा यांनी पाकिस्तान महिला संघाची कर्णधार फातिमा सना हिच्याशी हस्तांदोलन केले. याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भारतीय क्रिकेटप्रेमी संतप्त झाले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन न करण्याची भूमिका घेतली असताना जय शहा यांनी पाकिस्तानी संघाच्या कर्णधाराशी जाहीर हस्तांदोलन कसे केले? खेळाडू आणि जय शहा यांच्यासाठी वेगवेगळे नियम आहेत का? असा सवाल क्रिकेटप्रेमी करत आहेत.**

**लंडन** येथील ऐतिहासिक वॉटरलू पुलावर महिला टी-२० विश्वचषकात खेळणाऱ्या सर्व संघांच्या कर्णधारांच्या ट्रॉफीबरोबर फोटोशूटचा अधिकृत कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात संघांच्या कर्णधारांचे स्वागत करण्याची जबाबदारी आयसीसी अध्यक्ष म्हणून जय शहा यांनी पार पाडली. यावेळी त्यांनी पाक कर्णधार फातिमा सना हिच्याशी हस्तांदोलन केले. काही तासांत या हस्तांदोलनाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर मोठीच खळबळ उडाली. या हस्तांदोलनावर सोशल मीडियावर उलटसुलट प्रतिक्रिया येत आहेत. काही जणांनी हा केवळ प्रोटोकॉलचा भाग असल्याचे म्हणत जय शहा यांचे समर्थन केले आहे. यामुळे दोन्ही देशांच्या संघात कटुता संपून सौहार्द निर्माण होईल, असेही काही जणांनी म्हटले आहे. मात्र अनेकांनी जय शहा यांच्यावर टीका केली आहे. एका युजरने म्हटले आहे की, जय शहा... तुम्ही असे कसे करू शकता? नियम फक्त खेळाडूंनाच लागू आहेत का? काहींनी ही जय शहा यांची क्रिकेट डिप्लोमसी असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने पाक कर्णधार फातिमा सनाशी हस्तांदोलन केले नाही. त्यावरून जय शहा हस्तांदोलन करू शकतात. परंतु भारतीय कर्णधार हस्तांदोलन करू शकत नाही, अशी खिल्लीही उडवली जात आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर भारत-पाकिस्तानचे संबंध इतके बिघडले की, खेळाच्या मैदानावरही त्याचा परिणाम झाला. भारतीय संघाने मैदानात पाकिस्तानी खेळाडूंशी औपचारिकता म्हणूनही हस्तांदोलन करणे पान ५ वर

### १२ जून रोजी भारत-पाक सामना

इंग्लंडमध्ये १२ जूनपासून विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होत असून, या स्पर्धेत १२ संघ ३३ सामने खेळणार आहेत. भारत आपला पहिला सामना १४ जूनला पाकिस्तान विरुद्ध बर्मिंगहॅम येथे खेळणार आहे. यापूर्वी भारतात झालेल्या एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता. हा विश्वचषक भारतानेच जिंकला होता. भारत-पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत १६ सामने झाले असून, त्यात १३ भारताने जिंकले आहेत.

## नीट प्रश्नपत्रिका तयार करणारे २१ जूनपर्यंत लॉकडाऊनमध्ये



■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** २०२६ पुनर्परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याची कोणतीही शक्यता टाळण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आणि केंद्र सरकारने कडक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या आहेत. प्रश्नपत्रिका तयार करणारे तज्ज्ञ, मॉडरेटर आणि अनुवादक यांना २१ जूनपर्यंत एका अज्ञात आणि सुरक्षित ठिकाणी 'लॉकडाऊन'मध्ये ठेवून त्यांचा बाहेरील जगाशी असलेला सर्व संपर्क तोडण्यात आला आहे. ही पुनर्परीक्षा २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत देशातील ५५१ शहरांमध्ये पेन-पेपर पद्धतीने होणार आहे. नीटचे पेपर हवाई दलाच्या विमानांनी पाठविण्याचा हास्यास्पद प्रकारही प्रथमच होणार आहे.

मे महिन्यात झालेल्या नीट परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांमुळे देशभरात वाद निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर २१ जून रोजी होणारी पुनर्परीक्षा पूर्णपणे सुरक्षित आणि विश्वासार्ह ठरावी यासाठी प्रशासनाने ही कडक भूमिका घेतली आहे. यानुसार प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या पान ७ वर

## 'एनएसयुआय'च्या याचिकेवर सीबीएसईला कोर्टाची नोटीस

सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) प्रणालीतील अनियमितता आणि गोंधळाच्या आरोपांवरून नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय)ने दाखल केलेल्या जनहित याचिकेची दिल्ली उच्च न्यायालयाने दखल घेत याप्रकरणी सीबीएसईला नोटीस बजावून उत्तर मागवले आहे. न्या. नीना बन्सल कृष्णा आणि न्या. मधू जैन यांच्या खंडपीठासमोर आज या याचिकेची सुनावणी झाली. यावेळी सीबीएसईने ही याचिका राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा करत ती ग्राह्य धरू नये, अशी भूमिका मांडली. मात्र, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी यापूर्वी अशाच स्वरूपाच्या याचिका स्वीकारल्याचा दाखला देत बाजू पान ७ वर

## 'इंडिया' आघाडीच्या बैठकीत ५ मुद्यांवर एकमत

### एसआयआर, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर चर्चा

■ नवी दिल्ली

**विरोधी** पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची अत्यंत महत्त्वाची आणि मॅरेथॉन बैठक आज नवी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लब येथे पार पडली. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर विरोधी पक्षांची एकजूट मजबूत करण्यासाठी आणि संसदेच्या आगामी अधिवेशनात केंद्र सरकारविरोधात रणनीती आखण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीनंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या बैठकीत पाच महत्त्वाच्या मुद्यांवर एकमत झाले आहे.

खरगे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली की, सर्व घटक पक्षांमध्ये ५ मुद्यांवर पूर्ण सहमती झाली आहे. एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादीतील कथित गैरप्रकार आणि मतांच्या चोरीच्या विरोधात देशाच्या सरन्यायाधीशांना पत्र लिहून दाद मागितली जाईल. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. देशातील वाढती बेरोजगारी, महागाई आणि ढासळती आर्थिक परिस्थिती यावर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारने पान ७ वर

## ममता बॅनर्जींना आणखी मोठा धक्का

### २० खासदारांचा एनडीएला पाठिंबा?

■ कोलकाता

**तृणमूल** काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी आज इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत होत्या. त्याच वेळी त्यांच्या पक्षाच्या २८ पैकी २० खासदारांनी बंडाचा पवित्रा घेतला. या खासदारांनी एनडीए सरकारला समर्थन देणार असल्याचा निर्णय घेतल्याचा दावा फुटीर आमदार काकोली घोष यांनी केला. यासंदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्रही देणार असल्याचे त्यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वी तृणमूलच्या ५८ आमदारांनीही ममता यांची साथ सोडली होती. आपले फोडाफोडीचे तंत्र वापरून शिवसेना, राष्ट्रवादी आणि आप या पक्षांनंतर आणखी एका पक्षात फूट पाडण्यात भाजपा यशस्वी ठरला आहे.



फुटीर २० खासदारांपैकी ११ खासदारांची आज दुपारी केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे पश्चिम बंगाल प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला राज्यसभेच्या सदस्यत्वाचा आणि पक्षाचा राजीनामा दिलेले तृणमूलचे ज्येष्ठ नेते सुखेंदू शेखर रॉय हेही उपस्थित होते. पान ५ वर

## दादरमध्ये प्लाझा सिनेमाजवळ बेस्ट बसचा अपघात! १ ठार

■ मुंबई



**दादर** पश्चिम येथील प्लाझा सिनेमाजवळ आज सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास झालेल्या बेस्ट बसचा भीषण अपघातात दुचाकी चालक नियाज अहमद (२८) या तरुणाचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. जखमींना उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल केले. ही मे. इव्हे ट्रान्स (ओलक्ट्रा) कंपनीची वेट लीज बस होती.

अपघातात जखमी ऋषभ गुप्ता (२२) याच्या डोक्याला मार लागला असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. तर, सतिश वाघमारे (४८) बेस्ट बसचे निरीक्षक आणि महेश डोईफोडे (५०), अमित म्हात्रे (४१), बसचालक विकास पाडावे (४२), वाहक राजेंद्र पेलेकर (५७) हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी बस चालकावर गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली.

वीर कोतवाल उद्यानाकडून धारावी येथे जात असताना बसने एका चारचाकी वाहनाला आणि पान २ वर

## दोन महिन्यांनंतर युद्ध पुन्हा भडकले

### इस्त्रायल-इराणचे एकमेकांवर हल्ले

■ तेहरान

**इराण** आणि इस्त्रायल यांच्यात एप्रिलमध्ये झालेल्या युद्धविरामानंतर दोन महिन्यांनी आखाती युद्धाचा पुन्हा भडका उडाला आहे. इराणने काल रात्री इस्त्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागल्यानंतर या हल्ल्यांना प्रत्युत्तर देत इस्त्रायलने इराणमधील लष्करी ठिकाणांवर हल्ले केले. युद्धविरामानंतर दोन्ही देशांमध्ये झालेली ही पहिली थेट लष्करी कारवाई आहे. विशेष म्हणजे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना मोठा प्रतिहल्ला करू नका, असा सल्ला देऊनही इस्त्रायलने इराणमध्ये लष्करी कारवाई केली.

काल रात्री इराणने उत्तर इस्त्रायलमधील शहरांकडे १० बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली होती. बेरूतवरील इस्त्रायली हल्ल्यांच्या निषेधार्थ हा हल्ला करण्यात आल्याचा दावा इराणने केला. एप्रिल ८ रोजीच्या युद्धविरामानंतर इराणकडून इस्त्रायलवर झालेला हा पहिला थेट हल्ला होता. प्रत्युत्तरादाखल इस्त्रायलने सोमवारी पहाटे पश्चिम आणि मध्य इराणमधील लष्करी तळांवर हल्ले केले. इराणची राजधानी तेहरान पान ७ वर

## इतरांना जसा न्याय, तसा मला का नाही?

### राज्यसभा उमेदवारीवरून भुजबळांची खंत

■ मुंबई

**उपमुख्यमंत्रिपद** सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून काल राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. काल उशिरा झालेल्या नाट्यमय घडामोडींनंतर आज जैन यांनी अधिकृतपणे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. विशेष म्हणजे, या प्रसंगी मंत्री छगन भुजबळही तेथे उपस्थित होते. अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना भुजबळांनी इतरांना जसा न्याय मिळतो, तसा मला का मिळत नाही? अशी खंत व्यक्त करत आपल्याच पक्षातील नेत्यांना टोलाही हाणला.



राज्यसभेच्या जागेसाठी सुरुवातीला ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर असल्याची जोरदार चर्चा होती. मात्र भुजबळ यांनी आपला पुतण्या समीर याला राज्यात मंत्रिपद दिले तरच राज्यसभेवर जाईन अशी अट घातली होती. त्यामुळे राष्ट्रवादीने भुजबळ यांना डावलत अखेर प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय मानले जाणारे राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. पान ७ वर


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


## दाऊदी बोहरा समाजाबाबत निकाल

### न्यायाधीशाला धोका! मुलीवर हल्ला

■ मुंबई

**दाऊदी** बोहरा समुदायाच्या नेतृत्वाबाबत निकाल देणारे मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश जी. एस. पटेल आणि कुटुंबियांना देशातून आणि ब्रिटनमधून वारंवार जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. लंडनमध्ये नुकता पटेल यांच्या कन्येवर अज्ञात बुरखाधारी इसमाने हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या नाकाला फ्रॅक्चर झाले आहे.

२३ एप्रिल २०२४ रोजी न्या. पटेल यांनी डॉ. सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन हे ५३ वे दाई (सर्वोच्च अध्यात्मिक आणि धार्मिक नेते) आहेत, असा निकाल दिला होता. सैफुद्दीन यांच्या दाईपदाला ताहेर फखरुद्दीन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकेद्वारे आव्हान दिले होते. त्यांची याचिका न्या.पटेल यांनी फेटाळून लावली होती. त्यांच्या या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या संयुक्त खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे. हा निकाल दिल्यापासून न्या. पटेल आणि त्यांच्या कुटुंबियांना वारंवार धमक्या दिल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी न्या.पटेल यांच्या लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या मुलीला धमकीचे निनावी पत्र आले होते. या पत्रात न्या.पटेल आणि त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्यासाठी सुपारी दिल्याचे सांगण्यात आले होते. या पत्रासोबत एक इलेक्ट्रॉनिक उपकरण पाठवण्यात आले होते. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव ते उपकरण हाताळले नाही.

## अयोध्या राम मंदिराच्या कोट्यवधी देणग्या गायब! अखिलेश यांचा आरोप

**अयोध्येतील राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांपैकी कोट्यवधी रुपयांची रक्कम गायब झाल्याचा गंभीर आरोप समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी केला. या प्रकरणी मंदिर ट्रस्टवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने हे आरोप फेटाळून लावत सर्व कामकाज पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू असल्याचा दावा केला.**



■ अयोध्या

**अखिलेश** यादव यांनी एक्स पोस्टमध्ये लिहिले की, जगभरातील प्रभू रामाच्या भक्तांसाठी ही अत्यंत संवेदनशील बाब आहे. राम मंदिराला अर्पण करण्यात आलेल्या देणगीतील कोट्यवधी रुपयांची रक्कम गायब झाल्याची माहिती आहे. ही परिस्थिती मंदिर ट्रस्टसाठी अत्यंत लाजिरवाणी असून, याबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. या प्रकरणाचा थेट संबंध जगभरातील सनातन धर्मीयांच्या प्रभू रामावरील गाढ श्रद्धेशी असल्याने न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे. या प्रकरणावर सरकारचे मौन संशयास्पद वाटत आहे. या आरोपांवर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य महंत दिनेंद्र दास महाराज यांनी सर्व आरोप फेटाळत म्हटले की, ट्रस्टमधील प्रत्येक निर्णय सामूहिकपणे घेतला जातो व त्याची लेखी नोंद ठेवली जाते.

## शीतल तेजवानीला हायकोर्टाकडून सशर्त जामीन! कारागृहाबाहेर येणार

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार पार्थ पवार यांच्याशी संबंधित कोरेगाव पार्क येथील जमीनखरेदी प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानी हिची उच्च न्यायालयाच्या एकल पिठाचे न्या. अश्विन भोबे यांनी खडक पोलीस ठाण्यातील गुन्ह्यात २ लाखांच्या हमीपत्राच्या जमिनावर सुटका केली. यापूर्वी न्यायालयाने पोलिसांच्या हलगर्जीपणावर बोट ठेवत दोन प्रकरणात तिची अटक बेकायदा ठरवत दोषमुक्त केले आहे.

मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शीतल तेजवानीला ३ डिसेंबर रोजी अटक केली. त्याच प्रकरणात पिंपरी व बावधन या दोन्ही पोलीस ठाण्यांत दाखल दोन वेगवेगळ्या एफआयआरमध्ये तेजवानी हिला केलेली अटक बेकायदेशीर ठरवत हायकोर्टाने त्यांच्या तत्काळ सुटकेचे आदेश एप्रिल महिन्यात दिले. त्यानंतर शीतल तेजवानी हिच्या वतीने अ‍ॅड. दीपाली केदार यांच्यामार्फत खडक पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी रितसर जामीनासाठी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्या. अश्विन भोबे यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने २ लाखांच्या हमीपत्राच्या जामिनावर सुटका केली. त्यामुळे तेजवानी हिचा तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# लोकायन परिषदेत महाराष्ट्राच्या लोककलेला प्रतिसाद

मुंबई



**मुंबईतील** लोकायन संस्था, नवी दिल्लीची प्रज्ञा संस्था आणि एसजीटी विद्यापीठ गुरुग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय लोकसंस्कृतीचे लोकनायक- लोकनायिका यांची सामाजिक भूमिका आणि समर्पण या विषयावर लोकायन राष्ट्रीय संशोधन परिषद एसजीटी विद्यापीठ, गुरुग्राम (हरियाणा) येथे संपन्न झाली. संपूर्ण भारतातून अनेक प्राध्यापक, कलाकार तसेच अभ्यासकांनी आपापल्या राज्यांतील लोकनायक-लोकनायिकांचे चरित्र आणि त्यांच्या कार्याविषयीचे महत्त्व सादर करून कालौघात लोप पावलेल्या कलांवर प्रकाश टाकला. यात महाराष्ट्रातील लोककलांच्या सादरीकरणाला प्रतिसाद लाभला. या राष्ट्रीय संशोधन परिषदेत अतिशय अभ्यासपूर्ण आणि विविधांगी शोधपत्राचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. याप्रसंगी एसजीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) हेमंत वर्मा, प्र-कुलपती प्रा. (डॉ.) जगदीश्वर राव बसुतकर, प्रज्ञा संस्थेचे देवेंद्र राय आदी मान्यवर उपस्थित होते.

# सुरतमध्ये सेप्टिक टँक साफ करताना ४ कामगारांचा मृत्यू

मुंबई

**सुरतमधील** एका दागिने बनवण्याच्या कंपनीतील सेप्टीक टँक साफ करण्यासाठी टाकीत उतरलेल्या चार कामगारांचा विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला.

या घटनेची माहिती देताना परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त अलोक कुमार यांनी सांगितले की, सकृतदर्शनी या कामगारांचा मृत्यू विषारी वायूमुळे झाल्याचे दिसून येत आहे. मात्र शवविच्छेदन अहवालातून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. अश्विनी कुमार परिसरात असलेल्या या कंपनीत दागिने स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेत वापरली जाणारी रसायने या सेप्टीक टँकमध्ये जमा केली जात होती. या टाकीची दर दोन महिन्यांनी एकदा सफाई केली जाते. काल एक सुपरवायझर आणि तीन कामगार सफाई करण्यासाठी टाकीत उतरले असता टाकीतील कोंडलेल्या विषारी वायूमुळे ते सर्व बेशुद्ध पडले आणि काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला.

# नाशिकमध्ये भाजपा बंडखोर प्रसाद हिरे यांची माघार! नरेंद्र दराडे यांना पाठिंबा

नाशिक

**नाशिक** विधान परिषदेच्या निवडणुकीतील भाजपामधील बंडखोरीवर अखेर पडदा पडला. बंडखोर उमेदवार प्रसाद हिरे यांनी महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना जाहीर पाठिंबा देत माघार घेतली. मंत्री गिरीश महाजन आणि उदय सामंत यांच्या मध्यस्थीमुळे हा तिढा सुटला. मात्र गोकुळ गीते यांच्यासोबत चर्चा सुरू असल्याचे महाजन यांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून नाशिक आणि जळगाव विधान परिषद निवडणुकांतील बंडखोरीमुळे महायुतीच्या नेत्यांची चिंता वाढली होती. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतरही बंडखोर उमेदवारांना समजावण्याचे प्रयत्न सुरू होते. यासाठी गिरीश महाजन आणि उदय सामंत यांनी अनेक बैठका घेतल्या. आज मंत्री दादा भुसे, उदय सामंत, गिरीश महाजन यांच्यासह प्रसाद हिरे यांची दीड तास बैठक झाली. त्यानंतर महाजन यांनी सांगितले की, आमचे दोन्ही उमेदवार मागे घेणार हे सुरुवातीपासून सांगत होतो. हिरे यांनी माघार घेण्याचा निर्णय घेतला. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यामुळे त्यांनी आता महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांना जाहीर पाठिंबा दिला. नाशिकचा प्रश्न मिटला लवकरच जळगावचा प्रश्न सुटेल.गोकुळ गीते यांच्यासोबत फोनवर चर्चा सुरू आहे.

# एनडीएतील अनेक घटक पक्ष इंडिया आघाडीच्या संपर्कात

मुंबई

**भाजपाच्या** नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) अनेक घटक पक्ष भाजपाच्या गुलामगिरीला कंटाळले. आगामी

## संजय राऊत यांचा दावा

लोकसभा निवडणुकीपूर्वी एनडीएतील अनेक घटक पक्ष आमच्या इंडिया आघाडीत सामिल होतील, असा दावा शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केला.आज दिल्लीत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर राऊत बोलत होते.

राऊत म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वाखालील अनेक घटकपक्ष भाजपाच्या गुलामगिरीला कंटाळले आहेत. योग्य वेळ व योग्य संधीची ते वाट पहात आहेत.आगामी लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच ते पक्ष भाजपाची साथ सोडून इंडिया आघाडीत सामिल होतील. आणीबाणीच्या काळात सुरुवातीला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पाठिंबा देणारे बाबू जगजीवन राम २ फेब्रुवारी १९७७ रोजी काँग्रेसमधून बाहेर पडले होते.

# उपमुख्यमंत्र्यांना डावलल्याने सिडकोसह नवी मुंबई विमानतळ प्रशासनाला नोटीस

नवी मुंबई

**नवी मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. मात्र या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार दोन्ही नेते अनुपस्थित होते. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना अधिकृत निमंत्रण नसल्याची माहिती आहे. त्यामुळे याप्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयाने राजशिष्टाचाराचे उल्लंघन झाल्याने सिडको प्रशासन आणि नवी मुंबई विमानतळ प्राधिकरणाला कारणे दाखवा नोटीस बजावत खुलासा मागवला आहे.

या कार्यक्रमाचे नियोजन करताना जिल्हाधिकारी कार्यालय आणि सिडको प्रशासनाने शासनाच्या प्रोटोकॉलचे पालन केले का, याचीही चौकशी केली जात आहे. भविष्यात अशा कार्यक्रमांमध्ये राज्य शिष्टाचाराचे नियम काटेकोरपणे पाळावेत आणि अशा प्रकारची चूक पुन्हा होऊ नये, अशा सूचनाही संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यानंतर आता मुख्यमंत्री कार्यालयाने थेट खुलासा मागवला आहे.

# दिल्ली-चेन्नई जीटी एक्स्प्रेसवर हल्ला सहाय्यक लोको पायलट रक्तबंबाळ

अमरावती

**आंध्र** प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्यात धावत्या दिल्ली-चेन्नई जीटी एक्स्प्रेसवर झालेल्या हल्ल्याने खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने रेल्वे इंजिनवर रिकामी मद्याची बाटली फेकल्याने इंजिनाची काच फुटून वरिष्ठ सहाय्यक लोको पायलट एम. जयराम गंभीर जखमी झाले. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत जीटी एक्स्प्रेस सुरक्षितपणे उलवपाडू रेल्वे स्थानकावर थांबवली. बाटली थेट इंजिनाच्या पुढील काचेवर आदळल्याने काच फुटली.त्याचे तुकडे जयराम यांच्या अंगावर उडाल्याने ते रक्तबंबाळ झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने उलवपाडू सरकारी रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर अधिक उपचारांसाठी त्यांना विजयवाडा येथे हलवले. प्राथमिक तपासानुसार, ही बाटली विरुद्ध दिशेने जाणाऱ्या दुसऱ्या रेल्वेगाडीतून फेकल्याचा संशय आहे. घटना घडली तो परिसर निर्जन असल्याने तेथे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे आरोपींचा शोध घेणे पोलिसांसमोर आव्हान ठरत आहे. रेल्वे पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# कर्जत येथे 'कुर्मी जोडो' अभियानाचा शुभारंभ

कर्जत

**रायगडच्या** कर्जत तालुक्यातील किरवली येथे शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत 'कुर्मी जोडो' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेच्या वतीने आयोजित किरवली येथील साईकृपा शेळके बंधू सभागृहात मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी समाजातील विविध घटकांच्या एकजुटीवर भर देत संघटना बळकट करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी महासभेचे राष्ट्रीय संरक्षक तथा माजी अध्यक्ष एल.पी.पटेल म्हणाले की, कुणबी, मराठा, पटेल, पाटीदार, कनवी, कुळंबी यांसह विविध समाजघटक राष्ट्रीय स्तरावर 'कुर्मी' म्हणून ओळखले जातात. हे सर्व समाज एकत्र आल्यास महाराष्ट्रात मोठी सामाजिक व संघटनात्मक ताकद निर्माण होऊ शकते. मध्यप्रदेशचे माजी मंत्री रामखिलावन पटेल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्शावर चालत समाजाने संघटित होण्याचे आवाहन केले.

# पावसाळा आपत्ती व्यवस्थापन मालाडमध्ये डिझास्टर कंट्रोल

मुंबई

**पावसाळ्यात** मुंबईतील विविध भागांत उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितींवर नियंत्रण मिळवण्यासाठी मालाडमध्ये आधुनिक डिझास्टर कंट्रोल रूम सुरू केली. कॅमेरे आणि २४ तास मॉनिटरिंगच्या सुविधेसह सज्ज झालेली ही यंत्रणा नागरिकांना जलद मदत पुरवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. प्रभाग क्रमांक ४ मध्ये सुरू केलेल्या या कंट्रोल रुममध्ये अत्याधुनिक वायफाय आधारित कॅमेऱ्यांची व्यवस्था केली आहे. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परिसरातील परिस्थितीवर रिअल-टाईम नजर ठेवली जाणार असून, आपत्तीच्यावेळी तात्काळ प्रतिसाद देणे सुलभ होणार आहे. स्थानिक नगरसेवक तेजिंदर सिंग तिवाना यांनी सांगितले की, मान्सून काळात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे वेळीच निराकरण व्हावे यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक गतिमान आणि नागरिक केंद्रित बनवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मुंबई भाजपाचे महामंत्री आचार्य पवन त्रिपाठी आणि माजी नगरसेविका जया सतनाम सिंग तिवाना उपस्थित होते.

# गोदावरी नदी प्रदूषणाविरोधात उबाठाचे रामकुंडावर आंदोलन

नाशिक

**नाशिकमध्ये** रामकुंड परिसरात गोदावरी नदीच्या प्रदूषणाविरोधात उबाठाकडून आंदोलन करण्यात आले. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर रामकुंड परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे झालेल्या तोडफोडीत सांडपाणी थेट गोदावरी नदी पात्रात मिसळत असल्याचा आरोप आंदोलकांकडून करण्यात आला. आंदोलनादरम्यान पदाधिकारी थेट नदीपात्रात उतरले आणि पाण्यात उतरून निषेध नोंदवण्यात आला. 'दक्षिण गंगा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीचे पावित्र्य धोक्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. गोदावरी नदीत ड्रेनेज व दुर्गंधीयुक्त सांडपाणी सोडले जात असल्याने भाविकांच्या स्नानासाठी येणाऱ्या रामकुंड परिसराची अवस्था दयनीय झाली आहे, असा आरोपही करण्यात आला. पालिकेच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला जाब विचारण्यासाठी उबाठाकडून हे आंदोलन करण्यात आले असून पुढील काळात अधिक तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.


गृह मंत्रालय भारत सरकार

# आपली जनगणना आपला विकास

भारतातील सर्वात मोठ्या लोकसहभागाचा उपक्रम, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याचे क्षेत्रीय कार्य १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान केले जात आहे. ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून विकसित भारत @२०४७ चा भक्कम पाया आहे.

**जनगणनेचा पहिला टप्पा**

- घर यादी व घर गणना
- एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत राज्य/केंद्रशासित प्रदेशाने निश्चित केलेल्या सलग ३० दिवसांच्या कालावधीत हा टप्पा राबविण्यात येईल.
- या टप्प्यात प्रत्येक घराची माहिती नोंदविण्यात येईल.
- घरातील सोयी सुविधा, धारण केलेली मालमत्ता व इतर मूलभूत माहिती संकलित करण्यात येईल.

**घरगणनेच्या क्षेत्रीय कार्याची वैशिष्ट्ये :**

- ३३ अधिसूचित प्रश्न प्रगणकाच्या मोबाईल ॲपवरच उपलब्ध
- ३३ अधिसूचित प्रश्नांशिवाय इतर कोणतेही प्रश्न विचारले जाणार नाहीत
- उत्तरदात्याकडून कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही
- गणनेदरम्यान कोणताही OTP देण्याची / QR कोड स्कॅन करण्याची आवश्यकता नाही

**जनगणनेचे लाभ काय आहेत?**

- भविष्यातील धोरणांसाठी अचूक आधार
- संसाधनांचे न्याय्य वितरण
- योग्य ठिकाणी योग्य योजना
- चांगल्या शाळा, रुग्णालये आणि रस्ते
- प्रत्येक वर्गाचा आणि क्षेत्राचा उत्तम विकास

टोल-फ्री हेल्पलाईन : १८५५

जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये घेण्यात येईल

**चला आपण आपली जबाबदारी पार पाडूया आणि जनगणनेत सहभागी होऊया!**

**तुमची माहिती पूर्णपणे सुरक्षित आहे**

- तुमची वैयक्तिक माहिती ही जनगणना कायदा, १९४८ नुसार गोपनीय ठेवली जाते
- तुमची नावे आणि ओळख उघड केली जात नाहीत
- तुमच्या वैयक्तिक माहितीचा उपयोग कोणत्याही कर किंवा तपासाच्या उद्देशासाठी केला जात नाही

**तुमच्या सहकार्याची आवश्यकता आहे**

- प्रगणक तुमच्या घरी येईल तेव्हा अचूक आणि परिपूर्ण माहिती द्या
- तुम्ही दिलेली अचूक माहिती येणाऱ्या अनेक वर्षांची प्रगती निश्चित करते



शेवटचे ६ दिवस शिल्लक!
अंतिम मुदत १४ जून २०२६

CensusIndia2027

क्रमांक:आरओसी-२०२६-२७/क्र-५/डी१०५१

# मेघालयात बांगलादेश सीमेवरील कुंपणाला गावकऱ्यांचा विरोध

■ शिलाँग

**भारत**-बांगलादेश सीमेवरील कुंपण उभारणीच्या प्रस्तावाविरोधात मेघालयातील सीमावर्ती लिंगखोंग गावातील नागरिक रस्त्यावर उतरले. कुंपण शून्य रेषेवरच उभारण्याची मागणी करत गावकऱ्यांनी आंदोलन छेडले.

मेघालयातील भारत-बांगलादेश सीमेवरील लिंगखोंग गावातील रहिवाशांनी सीमा कुंपण उभारणीच्या प्रस्तावाला विरोध दर्शवत आंदोलन केले. कुंपण सध्याच्या नियोजित ठिकाणी उभारल्यास गावाचा उर्वरित भारताशी संपर्क तुटण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे कुंपण शून्य रेषेवरच उभारावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

पूर्व खासी हिल्स जिल्ह्यातील लिंगखोंग हे गाव भारत-बांगलादेश सीमेवरील शून्य रेषेजवळ आहे. गावातील अनेक घरे सीमारेषेपासून अवघ्या काही मीटर अंतरावर आहेत. आंतरराष्ट्रीय करारानुसार सीमा कुंपण शून्य रेषेपासून किमान १५० यार्ड अंतरावर उभारावे लागते. मात्र, या नियमामुळे गावाचा काही भाग कुंपणाच्या बाहेर राहण्याची शक्यता आहे.

# नीट-सीबीएसई वादावर काँग्रेसची देशभरात ५० हून अधिक आंदोलने

■ नवी दिल्ली

**नीट** पेपरफुटी प्रकरण आणि सीबीएसईच्या गुणदान पद्धतीवरील वादाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने देशभरात विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ मोठे आंदोलन उभारल्याचा दावा एक्स पोस्टवर केला. काँग्रेस नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनी मे-जून महिन्यात दिल्ली, भोपाळ, भुवनेश्वर, नागपूरसह विविध शहरांमध्ये ५० हून अधिक आंदोलने झाल्याची माहिती दिली.

काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, १२ मेपासून विविध टप्प्यांत आंदोलने सुरू झाली. शास्त्री भवनाबाहेर निदर्शने, एनटीए हल्लाबोल आंदोलन, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे मोर्चे तसेच देशभरातील राज्य युनिट्सच्या माध्यमातून आंदोलनांची मालिका राबवली. भोपाळ, भुवनेश्वर आणि नागपूर येथेही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात निदर्शने केली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेत आणि संसदेबाहेर या विषयावर सातत्याने आवाज उठवला.

देश विदेश

# दुआ लिपाचा शाही विवाह! निर्बंधामुळे इटलीत नागरिक संतप्त

■ रोम

**पॉपस्टार** दुआ लिपा आणि अभिनेता कालम टर्नर यांच्या भव्य विवाहसोहळ्याविरोधात इटलीतील सिसिली बेटावरील स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीची लाट उसळली आहे. लंडनमध्ये खासगी नागरी विवाह केल्यानंतर या जोडप्याने पालेर्मो परिसरात तीन दिवसांचा आलिशान समारंभ आयोजित केला होता. या सोहळ्यावर सुमारे १.३ दशलक्ष पाउंड (सुमारे १.७ दशलक्ष डॉलर किंवा १६.५१ कोटी रुपये) खर्च झाला आहे.

विवाहसोहळयासाठी बाघेरिया येथील ऐतिहासिक व्हिला वाल्ग्वारनेरा आणि गॅलेरिया द'आर्ते मोडेर्ना यांसारख्या प्रसिद्ध स्थळांचा वापर करण्यात आला. कार्यक्रम पूर्णपणे खासगी ठेवण्यासाठी प्रशासनाने काही रस्ते बंद केले, सार्वजनिक ठिकाणांवरील प्रवेश मर्यादित केला, ड्रोन उड्डाणांवर बंदी घातली आणि शहराच्या काही भागांत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. या निर्बंधांमुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाल्याचा आरोप करण्यात आला. पालेर्मो शहरातील काही भाग केवळ निमंत्रित पाहुण्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्याने नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. निदर्शकांनी शहरात विविध ठिकाणी पोस्टर्स लावत आपला विरोध नोंदवला. पोलिसांनी पोस्टर्स हटविल्यानंतर संतप्त नागरिकांनी भित्तीचित्रे आणि इतर माध्यमांतून आपला निषेध नोंदवला. एका सामाजिक संघटनेने नागरिकांना आवाहन करत सार्वजनिक जागा सर्वांसाठी खुल्या राहिल्या पाहिजेत, त्या खासगी नफ्यासाठी बंद करता कामा नयेत, अशी भूमिका मांडली.



# संपूर्ण बलुचिस्तानमध्ये १० जूनला शटर-डाऊन बंद

■ क्वेटा

**झेहरीत** बलुचिस्तान नॅशनल पार्टीच्या (बीएनपी-एम) जिल्हा उपाध्यक्षांची गोळ्या घालून हत्या करण्याच्या घटनेचा निषेध करून पार्टीचे प्रमुख सरदार अख्तर जान मेंगल यांनी १० जून रोजी संपूर्ण बलुचिस्तानमध्ये शटर-डाऊन बंद ठेवण्याची घोषणा केली. या प्रकरणाची पारदर्शक चौकशी व्हावी आणि राजकीय नेत्यांवर होणारे हल्ले त्वरित थांबवावे, अशी मागणी पार्टीने केली.

सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत मुसियानी यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांना अटक करण्यात आली असून, त्यांना अंत्यविधीलाही उपस्थित राहू दिले नसल्याचा आरोप पक्षाने केला. या घटनेला राजकीय दडपशाहीचा भाग मानत आणि आदिवासी परंपरांचे उल्लंघन झाल्याचे सांगत संपूर्ण प्रांतात १० जून रोजी पूर्ण बंद पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

# तैवानला भेट देणाऱ्या न्यूझीलंडच्या ४ खासदारांवर चीनमध्ये प्रवेशबंदी

■ बीजिंग

**तैवान** दौऱ्यामुळे चीनने न्यूझीलंडच्या चार खासदारांवर एक वर्षासाठी चीन, हाँगकाँग आणि मकाऊमध्ये प्रवेशबंदी लागू केली आहे. तैवानला भेट देण्याबाबत त्यांनी माफी मागितली, तरच ही बंदी मागे घेतली जाऊ शकते, अशी अट चीनने घातली आहे. मात्र, खासदारांनी ही अट फेटाळून लावत चीनच्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मॉरीन पुग (नॅशनल पार्टी), डंकन वेब (लेबर पार्टी), लॉरा मॅकक्लूर (एसीटी पार्टी) आणि डेव्हिड विल्सन (न्यूझीलंड फर्स्ट पार्टी) असे प्रवेशबंदी करण्यात आलेल्या खासदारांचे नाव आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


हे खासदार मे महिन्यात एका संसदीय शिष्टमंडळाचा (पार्लमेंटरी डेलीगेशन) भाग म्हणून तैवानच्या दौऱ्यावर गेले होते. तैवान हा आपलाच एक भाग असल्याचा दावा चीन करतो.

# अमरनाथ यात्रेची लगबग सुरू! श्रीनगर-जम्मू मार्गावर कामांना गती

■ श्रीनगर

३ **जुलैपासून** सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि रामकी इन्फ्रास्ट्रक्चर यांनी श्रीनगर-जम्मू महामार्गावरील सुधारणा आणि सुशोभीकरणाच्या कामांना गती दिली आहे. यात्रेकरूंचा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित करणे, हा यामागील उद्देश आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, महामार्गावरील अनेक ठिकाणी रंगकाम आणि देखभालीचे काम सुरू आहे. यामध्ये स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण राखण्यासाठी रस्त्यावरील दुभाजक, क्रॅश बॅरियर्स, कर्बस्टोन्स आणि इतर पायाभूत सुविधांचा समावेश आहे. दरवर्षी देशभरातून हजारो यात्रेकरू या यात्रेत सहभागी होत असल्याने विविध संस्थांच्या तयारीचा हा एक भाग आहे. यात्रेचा ताफा येण्यापूर्वी निर्धारित वेळेत काम पूर्ण व्हावे, यासाठी महामार्गाच्या विविध भागांवर कामगार तैनात करण्यात आले आहेत. केवळ महामार्गाचे स्वरूप बदलणे हाच उद्देश नाही, तर यात्रेकरू आणि इतर प्रवाशांना सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हा देखील आहे. अमरनाथ यात्रेदरम्यान बाल्टाल आणि नुनवान या दोन मुख्य



बेस कॅम्पवर पोहोचणाऱ्या यात्रेकरूंसाठी श्रीनगर-जम्मू महामार्ग हा मुख्य रस्ता आहे. रस्ता सुशोभित करण्याव्यतिरिक्त प्रवास सुरळीत आणि सुलभ व्हावा यासाठी विविध विभाग पायाभूत सुविधा सुधारणा, वाहतूक व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक्सच्या तयारीमध्ये गुंतले आहेत.

# कामाठीपुरानंतर डोंगरी क्लस्टर पुनर्विकासावर म्हाडाची नजर!

पान ८ वरून

प्रकल्प ठरेल. भेंडी बाजार पुनर्विकासाचा दुसरा टप्पा सध्या सुरू असून, तो सैफी बुरहानी अपलिफ्टमेंट ट्रस्ट या संस्थेमार्फत राबविला जात आहे. तर कामाठीपुरा पुनर्विकासासाठी म्हाडाने भगिरथी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि माठी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त गटाची निवड केली आहे. एप्रिलमध्ये या गटाला मंजुरीपत्र देण्यात आले असून, एसपीव्ही म्हणजेच विशेष उद्देश वाहन स्थापन करणे, आर्थिक पूर्तता करणे तसेच मास्टर प्लॅन तयार करून सादर करणे या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

प्रस्तावित पुनर्विकास क्षेत्र सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला असून दक्षिणेला सरदार वल्लभभाई पटेल मार्ग आणि उत्तरेला रामचंद्र भट्ट रोड (जे.जे. हॉस्पिटल रोड) यांच्या दरम्यान आहे. पश्चिमेकडे हा परिसर जे.जे. उड्डाणपुलापर्यंत विस्तारू शकतो. या प्रकल्पाचा एकूण खर्च ४,५०१.९७ कोटी रुपये अपेक्षित आहे. म्हाडाने स्वतः हा प्रकल्प राबविल्यास सुमारे १,५६४ कोटी रुपयांचा नफा होऊ शकतो. मात्र बांधकाम व विकास संस्थेमार्फत प्रकल्प राबविल्यास नफा १,०४१.७४ कोटी रुपये राहील. या प्रस्तावाची व्यवहार्यता तपासण्यात आली असून, प्रकल्प आर्थिकदृष्ट्या शक्य असल्याचे आढळून आले आहे. या परिसरात ८१ इमारतींमध्ये एकूण १,९२८ निवासी आणि २६८ व्यावसायिक गाळे आहेत. त्यापैकी बहुतांश इमारती ६० वर्षांहून अधिक जुन्या आहेत. सर्व रहिवासी आणि व्यावसायिक धारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन केले जाईल. तसेच प्रकल्पाच्या चार वर्षांच्या कालावधीत त्यांना संक्रमणकालीन भाडे (ट्रान्झिट रेंट) दिले जाईल.

# पाकिस्तानी कर्णधारासोबत जय शहांचे हस्तांदोलन

पान १ वरून

बंद केले. भारत आणि पाकिस्तान यांच्यात गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात दुबईत झालेल्या आशिया कप सामन्यात भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन केले नाही. या स्पर्धेत भारताचा तीन वेळा पाकिस्तानशी सामना झाला. मात्र, एकाही सामन्यात भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाशी यांच्याशी नाणेफेकीच्या वेळी हस्तांदोलन केले नाही. तसेच सामना संपल्यावरही दोन्ही देशांच्या खेळाडूंनी एकमेकांशी हस्तांदोलन केले नाही. या हस्तांदोलन वादाचे पडसाद अंतिम सामन्यात उमटले. अंतिम सामन्यात भारताने विजय मिळवल्यावर आशिया क्रिकेट कौन्सिलचे प्रमुख असलेले पाकिस्तानचे मोहसिन नक्वी यांच्या हस्ते चषक स्वीकारण्यास भारताने नकार दिला. त्यानंतर नक्वी यांनी हा चषक पाकिस्तानला नेला, तो अजूनही भारताला मिळालेला नाही. त्यानंतर यावर्षी १५ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेतील कोलंबोत झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतही दोन्ही संघांच्या कर्णधारांनी हस्तांदोलन टाळले होते. महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतही भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंबरोबर हस्तांदोलन केले नव्हते. विशेष म्हणजे, भारतीय क्रिकेट बोर्डाने खेळाडूंना याबाबत कुठलीही सूचना दिली नव्हती. हा खेळाडूंचाच निर्णय असल्याचे भारतीय पुरुष संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने म्हटले होते. यामुळे त्याच्यावर टीकाही झाली होती. आता जय शहा यांनी पाक कर्णधाराशी हस्तांदोलन केल्यानंतर मैदानात भारत-पाक संघाचे खेळाडू मैदानात एकमेकांशी हस्तांदोलन करणार का, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# ममता बॅनर्जींना आणखी मोठा धक्का

पान १ वरून

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनीही त्यांची भेट घेतली. या बैठकीत काकोली घोष, शताब्दी रॉय, अबू ताहिर, अरूप चक्रवर्ती, खलीलुर रहमान, शर्मिला सरकार, असित मल, कालीपद सोरेन, जगदीश बसुनिया आणि प्रसून बॅनर्जी हे खासदार उपस्थित होते. तत्पूर्वी काल रात्री दिल्लीतील एका अज्ञात ठिकाणी तृणमूलच्या २० खासदारांची अनौपचारिक बैठक झाली होती. या बैठकीत पक्षाच्या सध्याच्या नेतृत्वाविषयी नाराजी व्यक्त करण्यात आली.आज या बैठकीचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला. अनेक खासदार एका टेबलाभोवती बसल्याचे त्यात दिसत होते. फोटो काढण्यावरून बैठकीत वाद झाल्याचेही सांगितले जाते. फोटोमध्ये दिसणाऱ्या खासदारांपेक्षा प्रत्यक्ष उपस्थितांची संख्या अधिक होती. दरम्यान, कोएल मल्लिक यांनीही आपल्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे.

तृणमूलचे सध्या लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. ३ जून रोजी बंगालमधील ८० पैकी ५८ आमदारांनी एक स्वतंत्र गट स्थापन केला. या गटाने ऋताब्रता यांची आपला नेता म्हणून नियुक्ती केली आहे.

# राष्ट्रवादीचा वर्धापन दिन एक दिवस पुढे ढकलला

**मुंबई** - राष्ट्रवादीचा १० जूनला होणारा वर्धापन दिन सोहळा एनडीएच्या बैठकीमुळे एक दिवस पुढे ढकलण्यात आला. आता हा सोहळा ११ जून रोजी दुपारी २ वाजता मुंबईतील किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहात होईल, अशी माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माध्यमांना दिली. नवी दिल्लीत १० जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एनडीए घटक पक्षांची तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीला देशभरातील एनडीएचे सर्व प्रमुख घटक पक्ष, त्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. परिणामी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना १० जून रोजी दिल्लीत या बैठकीला उपस्थित राहावे लागणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला आहे.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई-निविदा सूचना क्र. २३/२०२६**

खालील कामांसाठी म.औ.वि.महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | कोरी ई-निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| अ) | का.अ., मऔविम, माहिती तंत्रज्ञान विभाग, पुणे | | |
| १ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान हिंजवडी... अस्तित्वात असलेल्या पंप हाऊसचे उन्नतीकरण करणे तसेच नवीन पंप हाऊस व नवीन संच तयार करणे व उदंचन केंद्रापासून ते जलशुद्धीकरण केंद्र हिंजवडीपर्यंत नवीन ९०० मी.मी. व्यासाची DI-K ९ अशुद्ध पाण्याची उदंचन वाहिनी टाकणे (**दुसरी मागणी**) (**उत्तर अर्हता प्रपत्रे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील**) | ६७,१७,६९,८५६/- | १०/०६/२०२६ ते ०६/०७/२०२६ |

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई- ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel: 022- 62491111, 022-62491112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org mahaprasad@siddhivinayak.org

**Nit Document**

**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.**

महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या वेलची खरेदीसाठी ई - निविदा मागविण्याबाबत.

महाप्रसादाची नारळवडी बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजुरी कामाचे कंत्राट देण्याकरीता ई- निविदा मागविण्याबाबत.

प्रसादाकरीता लागणारी प्रसादपिशवी खरेदी करण्यासाठी ई - निविदा मागविण्याबाबत.

**पुरवठा कालावधी**

**माहे जून २०२६ ते दिनांक ३१ मे, २०२७ पर्यंत**

**ई - निविदा सूचना :**

१. मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे लाडू व नारळवडी बनविण्यासाठी लागणाऱ्या वेलचीच्या खरेदीसाठी ई - निविदा मागविण्यात येत आहेत. २. महाप्रसादाची नारळवडी बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजुरी कामाचे कंत्राट देण्याकरीता ई- निविदा मागविण्याबाबत तसेच ३. प्रसादाकरीता लागणारी प्रसादपिशवी खरेदी करण्यासाठी ई - निविदा मागविण्याबाबत.

ई-निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई - निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | -: मंगळवार, दि. ०९ जून, २०२६ |
| ई-निविदापुर्व बैठक वार व दिनांक | -: शुक्रवार, दि. १२ जून, २०२६ दु. २.०० ते ४.०० वा. |
| कच्चा माल नमुना तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | -: सोमवार, दि. १५ जून, २०२६ सायं. ५.०० वा. |
| ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | -: शनिवार, दि. २० जून, २०२६ सायं. ५.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | -: सोमवार, दि. २२ जून, २०२६ दुपारी १.०० ते ४.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | -: सोमवार, दि. २२ जून, २०२६ दुपारी ३.०० वा |
| स्थळ | -: श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

सही /-
( वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी १०३९

## नवी मुंबई महानगरपालिका

समाज विकास विभाग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारसरणीवरील एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम

- प्रवेश प्रक्रिया सुरू -2 जुन 2026
- प्रवेशाची शेवटची तारीख- 16 जुन 2026
- प्रवेश प्रक्रिया - ऑनलाईन
- वर्गाची वेळ - शनिवार, रविवार
- माध्यम - मराठी आणि इंग्रजी
- अभ्यासक्रम कालावधी - एक वर्ष (दोनसत्रात), NEPनुसार
- Semester-I
  - Course1: Social Justice Discourse Paper-I (Credits-4)
  - Course2: Social, Political and Religious Thoughts of Dr.Ambedkar Paper-I (Credits-4)
  - Course3: Ambedkar's Thoughts and Contemporary Issues Paper-I(Credits-4)
  - Course4: Annihilation of Caste (Credits-2)
  - Course5: Dr.Ambedkar's Economic Thoughts Paper-I (Credits-4) (Elective Subject)
  - Course6: Research Methodology (Credits-4)
- Semester-II
  - Course1: Social Justice Discourse Paper-II (Credits-4)
  - Course2: Social,Political and Religious Thoughts of Dr.Ambedkar Paper- II(Credits-4)
  - Course3: Ambedkar's Thoughts and Contemporary Issues Paper-II(Credits-4)
  - Course4: Buddhaand His Dhamma (Credits-2)
  - Course5: Dr.Ambedkar's EconomicThoughtsPaper-II (Credits-4) (Elective Subject)
  - Course6: On Job Training/FieldWork (Credits-4)
- अभ्यासक्रम ठिकाण-1. भारतरत्न् डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, से-15 ऐरोली नवी मुंबई- 400708
  2. जे.पी.नाईक भवन,पहिला मजला,कलिना,सांताक्रूझ(पूर्व),मुंबई-400098
- मुंबई विद्यापीठाकडून मूल्यांकन आणि प्रमाणपत्र
- प्रवेशाकरीता वयाची अट नाही
- मान्यता प्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेतील पदवीधरांकडूनअर्जस्विकारलेजातील
- संपर्क क्रमांक :- 1. मुंबई विद्यापीठ कार्यालय- 9372734247, 7350408686
  2. श्री.दशरथ गंभीरे (समाजसेवक - नमुंमपा) - 9702309054
- वेबसाईट : http://muadmission.samarth.edu.in
- अधिकृत ईमेल : dacfsj.coordinator@mu.ac.in

संचालक प्रा.मनिषा कर्णे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र आणि मुंबई, अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण विद्यालय, मुंबई विद्यापीठ, कलिना)

उपआयुक्त - (भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक) नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र- नमुंमपा/जसं/जाहिरात/420/2026

## जाहिर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **श्री. ब्रम्हानंद प्रभाकर पई**, मुंबई, भारतीय निवासी, राहणार ए/२, १ला मजला, ओम खुशल को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., तेजपाल स्कीम रोड क्र. ३, युनियन बँक ऑफ इंडिया समोर, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ यांचे सदनिका क्र. ५, मोजमाप ५२६ चौ.फू., कार्पेट क्षेत्रफळ, १ला मजला, "जोगेश्वरी जीवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि." संस्था, भूखंड क्र. ७, केजीएस सोसायटी रोड, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ४०००६० या मालमत्तेकरिता त्यांचे मूळ दस्तऐवज म्हणजेच,

१. बिल्डर्स/विकासक, एका भागाचे पक्षकार म्हणून; आणि सौ. सिधाराधना हेब्बार, त्यामधील खरेदीदार म्हणून उल्लेखित, दुसऱ्या पक्षाचे पक्षकार म्हणून, यांच्या द्वारे आणि दरम्यान मुंबई येथे बनविलेले सम दिनांकाचे करारपत्र.

वरील उल्लेखित गहाळ दस्तऐवज/जांच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही/सर्व व्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्था/स्थांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या समर्थनार्थ सर्व दस्तऐवजांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह ॲडव्होकेट, श्री. दिपेश जे. सांवला यांना कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट्स, सीएचएसएल, महंत रोड विस्तार, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे. असे न केल्यास असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध, जर असल्यास, कोणत्याही पुढील सूचनेशिवाय सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

सही/-
(श्री. दिपेश जे. सांवला)
ॲडव्होकेट
दिनांक: ०९.०६.२०२६

## जाहिर सूचना

याची **नोंद घ्यावी** की, आम्ही खाली नमूद केलेली मालमत्ता जी दि मॉडर्न वृंदावन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. शी संबंधित असून, तिचे नोंदणीकृत कार्यालय ६२-६४, दादीसेठ अग्यारी लेन, मुंबई – ४००००२ येथे आहे, याच्या शिर्षकाची चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर मालमत्तेच्या पुनर्विकास हक्कांच्या मंजुरीसंदर्भात आणि/किंवा सदर मालमत्तेवर अथवा तिच्या विरोधात अथवा तिच्या कोणत्याही भागावर वारसा, गहाण, ताबा, विक्री, भेट, भाडेपट्टा, विकास हक्क, वहिवाट, धारणाधिकार, शुल्क, ट्रस्ट, देखभाल किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्तींनी आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात अधोलिखितांना त्यांच्या कार्यालयात, ६२-६४, दादीसेठ अग्यारी लेन, मुंबई – ४००००२ येथे, या सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा, अशा कोणत्याही दावा किंवा आक्षेपाचा विचार न करता आम्ही शिर्षक प्रमाणपत्र जारी करू आणि तसेच जर काही असल्यास, ते त्यागलेले आणि/किंवा सोडून दिलेले मानले जातील.

**मालमत्तेचे तपशील**

भुलेश्वर विभागातील कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. १७७५ असलेली, मुंबई शहर नोंदणी जिल्हा व उपजिल्ह्याच्या हद्दीत येणारी, सुमारे ३२४.४२ चौरस मीटर क्षेत्रफळाची सर्व ती जमीनीचा भाग व खंड तसेच त्या जमिनीवर उभी असलेली दि मॉडर्न वृंदावन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. नावाची इमारत/बांधकामे, जी सी-वॉर्ड क्र. ४१६१ अंतर्गत मूल्यांकित असून मालमत्ता कर खाते क्र.सीएस०९००४६००९०००० धारण करते, आणि जी ६२-६४, दादीसेठ अग्यारी लेन, मुंबई – ४००००२ येथे स्थित आहे.

मुंबई, आज दिनांकित ९ जून २०२६.
**झोहेर अँड कं.**
**वकील आणि सॉलिसिटर्स**
चेंबर क्र.५ आणि ५-ए, तिसरा मजला, करीमजी इमारत, १११-ए, एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

मुंबई । मंगळवार
९ जून, २०२६
नवा काळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## वरुणचा गौप्यस्फोट



**दिग्दर्शक** श्रीराम राघवन यांच्या 'अंधाधुन' या २०१८ मधील रहस्यपटाला (थ्रिलर) प्रेक्षक आणि समीक्षकांकडून प्रचंड पसंती मिळाली होती. आयुष्मान खुराना, तब्बू आणि राधिका आपटे यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने अनेक पुरस्कारही पटकावले. मात्र, या चित्रपटाबाबत आता एक अतिशय धक्कादायक आणि रंजक माहिती समोर आली आहे. अभिनेता वरुण धवन याने स्वतः कबुली दिली आहे की, या चित्रपटासाठी सुरुवातीला त्याची आणि कंगना रणौतची निवड करण्यात आली होती.

युट्यूबवरील एका मुलाखतीदरम्यान वरुण धवनला त्याच्या कारकिर्दीत नाकारलेल्या आणि नंतर यशस्वी ठरलेल्या एखाद्या मोठ्या चित्रपटाबद्दल विचारण्यात आले होते. यावर बोलताना वरुणने सांगितले की, त्याने 'अंधाधुन' चित्रपटाला नकार दिला होता, ज्याचा त्याला नंतर पश्चात्ताप झाला, असे वरुणने मान्य केले. याच संभाषणात त्याने पुढे एक मोठा खुलासा केला की, या चित्रपटाची मूळ स्टारकास्ट आयुष्मान आणि तब्बू नसून, वरुण धवन आणि कंगना रणौत अशी निश्चित करण्यात आली होती.

## जॅकीदांचा तरुणांना सल्ला



**बॉलिवूडचे** ज्येष्ठ आणि लोकप्रिय अभिनेते जॅकी श्रॉफ हे त्यांच्या बिनधास्त आणि साध्या जीवनशैलीसाठी, तसेच त्यांच्या खास 'भिडू' शैलीतील सल्ल्यांसाठी ओळखले जातात. 'बी अ मॅन, यार' या प्रसिद्ध पॉडकास्टच्या एका भागात बोलताना जॅकी श्रॉफ यांनी आजच्या पिढीच्या मानसिक स्थितीवर भाष्य केले.

आजकालचे तरुण खूप लवकर मानसिक ताण घेतात, याकडे लक्ष वेधत ते म्हणाले की, आयुष्यात जोपर्यंत तुमचे आरोग्य उत्तम आहे, तोपर्यंत इतर सर्व ताणतणाव आणि अडचणी दुय्यम ठरतात. प्रत्येक माणसाचा अंत हा निश्चित आहे, हे सर्वांनाच ठाऊक आहे; त्यामुळे स्वतःबद्दल विनाकारण हळहळ न व्यक्त करता आयुष्य भरभरून जगले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. ते पुढे म्हणाले, जेव्हा आपल्याला शेवट माहितच आहे, तर तिथे उगाच आपली शाणपट्टी (शहाणपणा) दाखवण्यात काही अर्थ नाही. काही लोक स्वतःवरच सतत दया दाखवत बसतात, हे बंद करा, विषय संपला ! असे सांगून त्यांनी युवापिढीला बिनधास्त आयुष्य जगण्याचा मंत्र दिला आहे.

## चोखंदळ शिल्पा



**सध्या** डिजिटल विश्वात 'ओटीटी' प्लॅटफॉर्म्सची (इंटरनेटवरील मनोरंजन वाहिन्या) मोठी लाट आली असतानाही अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिने चित्रपटांच्या निवडीबाबत अतिशय चोखंदळ राहण्याचा निर्णय घेतला आहे. एका मुलाखतीदरम्यान तिने स्पष्ट केले की, प्रेक्षकांचे मनोरंजन करताना तिला कामाच्या दर्जाशी तडजोड करायची नाही. आजकाल प्रत्येक आठवड्याला विविध माध्यमांवर नवनवीन चित्रपट आणि मालिका उपलब्ध होत असल्यामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवणे आव्हानात्मक झाले असल्याचे तिने मान्य केले. शिल्पा म्हणाली की, आजच्या काळात प्रेक्षक आधीपेक्षा खूप जास्त सजग झाले आहेत. जर एखादा चित्रपट किंवा भूमिका त्यांच्या पसंतीस उतरली नाही, तर ते लगेचच दुसरीकडे वळतात. अशा परिस्थितीत केवळ पडद्यावर दिसण्यासाठी किंवा कामाचा आकडा वाढवण्यासाठी कोणताही चित्रपट स्वीकारण्यात काहीही अर्थ नाही. तिने सांगितले की, कोणत्याही नव्या प्रकल्पाला होकार देण्यापूर्वी कथेचा दर्जा व त्यात असलेल्या तिच्या भूमिकेचे महत्त्व या गोष्टी ती आवर्जून तपासते. आगामी काळातही प्रेक्षकांना काहीतरी दर्जेदार व मनोरंजक पाहायला मिळावे, हाच तिचा मुख्य प्रयत्न असणार असल्याचे तिने स्पष्ट केले.

## एकनिष्ठ माधवन



**चित्रपटसृष्टीतील** सर्वात लोकप्रिय आणि आदर्श जोडप्यांपैकी एक म्हणून आर. माधवन आणि त्याची पत्नी सरिता यांच्याकडे पाहिले जाते. नुकतीच त्यांच्या लग्नाला २७ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका मुलाखतीदरम्यान माधवनने आपल्या या वैवाहिक जीवनातील यशाचे श्रेय पूर्णपणे पत्नी सरिताला दिले. तो म्हणाला, या जगात मी माझ्या पत्नीवर सर्वाधिक प्रेम करतो. ती मला पूर्णपणे समजून घेते आणि माझे पाय जमिनीवर ठेवते. माझा मुलगा, माझे आई-वडील आणि माझी आर्थिक व्यवस्था या सर्वांची ती उत्तम काळजी घेते. एक यशस्वी अभिनेता होण्यासाठी मला ज्या स्वातंत्र्याची गरज असते, ते स्वातंत्र्य ती मला देते. माझ्या रागाची आणि चुकांची तिला सवय आहे, तसेच मी किती चांगला किंवा वाईट आहे हे मला स्पष्टपणे सांगायला ती कधीच घाबरत नाही. कुटुंबासाठी ती किती कष्ट करते हे ती कधी बोलून दाखवत नाही आणि त्याबद्दल कधी श्रेयाची अपेक्षाही करत नाही. ती माझ्यापेक्षा माझ्या आई-वडिलांचे अपत्य जास्त वाटते आणि तेही तिच्यावर जीवापाड प्रेम करतात.

ग्लॅमर जगतात राहूनही पत्नीशी एकनिष्ठ राहण्याबाबत विचारले असता माधवनने सांगितले, एकनिष्ठ राहणे हा सर्वात सोपा मार्ग आहे, असे मला वाटते. कारण जीवनात इतरही अनेक गोष्टी आहेत जिथे मला माझी ऊर्जा वापरायची असते. शिवाय, एकनिष्ठता हा आमच्या कुटुंबाचा गुणधर्म आहे. माझे संपूर्ण कुटुंब आयुष्यभर जमशेटजी टाटा यांच्याशी इतके एकनिष्ठ राहिले की, आमच्या देवघरात देवाच्या फोटोंसोबत त्यांचाही एक फोटो होता, ज्याला आम्ही हार घालत होतो. त्यामुळे निष्ठा मोडण्यासाठी मला माझ्या मूळ स्वभावाच्या विरोधात जावे लागेल. मला सुंदर मुलींचे आकर्षण नक्कीच वाटते, पण कोणत्याही बहाण्यांशिवाय घरी परत जाऊन पत्नीच्या कुशीत विसावणे मला जास्त आवडते, असे तो प्रांजळपणाने सांगतो.

## किस्सा काजोलच्या विस्मरणाचा



**दिग्दर्शक** करण जोहर यांच्या 'कुछ कुछ होता है' या गाजलेल्या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान अभिनेत्री काजोलसोबत एक भीषण अपघात झाला होता. यामध्ये काही काळासाठी तिची स्मरणशक्ती गेली होती. या अपघातानंतर सेटवरील कोणालाही न ओळखू शकणाऱ्या काजोलला केवळ तिचा मित्र आणि आताचा पती अजय देवगण यांचे नाव आणि ओळख आठवत होती, अशी एक रंजक आणि जुनी आठवण चित्रपट वर्तुळात पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

या चित्रपटातील 'ये लडका हाय अल्लाह' या गाण्याच्या चित्रीकरणादरम्यान काजोलला सायकल चालवायची होती. मात्र, सायकल चालवताना तिचा ताबा सुटला आणि ती थेट तोंडावर जमिनीवर पडली. या अपघातात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ती काही काळासाठी बेशुद्ध पडली होती. जेव्हा ती शुद्धीवर आली, तेव्हा तिला तिची स्मृती पूर्णपणे हरपली होती. ती शाहरुख खान किंवा करण जोहर कोणालाही ओळखत नव्हती आणि आपण मॉरिशसमध्ये काय करत आहोत, हेही तिला आठवत नव्हते. मात्र, या संपूर्ण गोंधळात तिला फक्त अजय देवगण यांची आठवण होती. अजयशी बोलताना तिला सर्व काही आठवू लागले आणि काही तासांतच तिची स्मरणशक्ती पूर्ववत झाली.

# अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य
# नगरसेवकाची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

■ बारामती

**बारामती** नगरपरिषदेचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे नगरसेवक किशोर मासाळ यांच्यावर अजित पवारांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या आरोपानंतर पक्षाने कारवाई केली. व्हायरल ऑडिओ क्लिपच्या पार्श्वभूमीवर त्यांची पक्षातून तत्काळ हकालपट्टी केली आहे.

या ऑडिओ क्लिपमध्ये मासाळ यांनी अजित पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पक्षात तीव्र नाराजी पसरली होती. पक्षाच्या नेत्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कारवाईची मागणी केली होती. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले की, किशोर मासाळ यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची माहिती दिली. त्यांनी या वक्तव्याचा तीव्र निषेध करत, पक्षाच्या शिस्तीला बाधा आणणाऱ्या कोणालाही सहन केले जाणार नाही. या प्रकरणानंतर किशोर मासाळ यांनी आपली चूक मान्य करत माफी मागितली. पश्चाताप म्हणून एक दिवसाचे अन्नत्याग आंदोलन करून आत्मक्लेश करणार असल्याचे सांगितले.

# फिलिपाईन्सला ७.८ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपाचा तडाखा! ३२ जणांचा मृत्यू

■ मनीला

**फिलिपाईन्सच्या** दक्षिणेकडील मिंदानाओ बेटाजवळ आज सकाळी ७.८ रिश्टर तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. या भीषण आपत्तीत किमान ३२ जणांचा मृत्यू झाला. तर २०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. भूकंपामुळे अनेक इमारतींचे नुकसान झाले. अनेक भागांत वीजपुरवठा खंडित झाला. भुकंपानंतर काही किनारी भागांना त्सुनामीच्या लाटा येऊन धडकल्याने नुकसान झाले.

फिलिपाईन्स इन्स्टिट्यूट ऑफ व्हॉल्कॅनॉलॉजी अँड सिस्मॉलॉजीच्या माहितीनुसार, सकाळी ७.३७ वाजता सारंगानी प्रांताच्या किनारपट्टीजवळ भूकंपाचा केंद्रबिंदू होता. त्यानंतर अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने ६.५ रिश्टर तीव्रतेपर्यंतचे सहा धक्के नोंदवले. कोसळणारे ढिगारे, भूस्खलन आणि इमारतींच्या पडझडीमुळे अनेकांचा मृत्यू झाला. भूकंपाचा सर्वाधिक फटका जनरल सँटोस शहराला बसला. भूकंपानंतर फिलिपाईन्स, इंडोनेशिया आणि मलेशियातील किनारी भागांसाठी त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला. सारंगानी भागांत १.४ मीटर उंचीपर्यंतच्या लाटा नोंदवण्यात आल्या. मात्र सुमारे दोन तासांनंतर भूकंपशास्त्र संस्थेने त्सुनामीचा इशारा मागे घेतला. दक्षिण फिलिपाईन्सजवळील भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा दिल्याने इंडोनेशियातील काही भागांतील नागरिकांना उंच ठिकाणी हलविण्यात आले.




# जिनपिंग-किम जोंग भेटीची जागतिक राजकारणात चर्चा



■ बीजिंग

**चीनचे** राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग आज दोन दिवसांच्या दौऱ्यावर उत्तर कोरियामध्ये दाखल झाले. जिनपिंग आणि उत्तर कोरियाचा हुकुमशहा किम जोंग ऊन यांची भेट होणार असल्याने जागतिक राजकारणात चर्चा आहे. जिनपिंग यांचा हा दौरा जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यत संवेदनशील मानला जात आहे.

जिनपिंग यापूर्वी २०१९ मध्ये उत्तर कोरियाच्या दौऱ्यावर गेले होते. उत्तर कोरिया आणि चीन यांच्यातली मैत्रीची पाळेमुळे कोरिया युद्धाच्या काळापासून जोडलेले आहेत. मात्र बदलत्या राजकीय समीकरणांमुळे आता ही मैत्री फारशी मजबूत राहिलेली नाही. त्यामुळे जिनपिंग यांचा हा दौरा केवळ सदिच्छा भेट नसून त्यामागे रशियाचे कनेक्शन व आंतरराष्ट्रीय राजकारणाची मोठी रणनीती असल्याचे सांगितले जात आहे. गेल्या काही वर्षांपासून उत्तर कोरिया व रशिया यांच्यातील लष्करी संबंध कमालीचे वृद्धिंगत झाले आहेत. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन व किम जोंग ऊन यांच्यातील जवळीक चीनसाठी चिंतेचा विषय बनली आहे. युक्रेन युद्धामध्ये उत्तर कोरियाने रशियाला मोठी लष्करी मदत पुरवली आहे. या युद्धात उ.कोरियाचे सुमारे २,३०० सैनिक मारले गेले आहेत. त्या बदल्यात रशियाकडून उ.कोरियाला तेल आणि मोठी आर्थिक मदत पुरवली जात आहे.उत्तर कोरिया पूर्णपणे रशियाच्या प्रभावाखाली जाऊ नये, ही चीनची इच्छा आहे. त्यामुळेच जिनपिंग उत्तर कोरिया दौऱ्यावर आले आहेत.चीन आणि उत्तर कोरिया दरम्यान संरक्षण करार अस्तित्वात आहे. त्यामुळे चीन कोणत्याही परिस्थितीत उ.कोरिया गमावू इच्छित नाही. या भागावर रशियाचे नियंत्रण वाढले तर चीनचा वचक कमी होईल, अशी भीती जिनपिंग यांना आहे.

# ठाणे महापालिका मुख्यालयात चौथ्या मजल्यावर आग

■ ठाणे

**ठाणे** महानगरपालिका मुख्यालयाच्या चौथ्या मजल्यावर आज सकाळी ८ वाजताच्या सुमारास आग लागली. शहर विकास विभागात लागलेल्या आगीवर वेळीच अग्निशमन दलाने नियंत्रण मिळवल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मुख्यालयातील एका यूपीएस युनिटमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. ही आग काही कागदपत्रे आणि पंख्यापर्यंत पसरली होती, मात्र ती कार्यालयाच्या एका भागापुरती मर्यादित राहिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन आणि बचावपथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सुरक्षारक्षक, आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी आणि अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने सकाळी अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळवले. आग आटोक्यात आल्यानंतर परिसरात कूलिंग ऑपरेशन करण्यात आले.

# शर्मिला ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त 'शिवतीर्थ'वर ठाकरे कुटुंब एकत्र

**मुंबई- मनसे** अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सपत्निक राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी भेट देण्यासाठी गेले होते. यावेळी आमदार आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे हेही उपस्थित होते.

या कौटुंबिक भेटीमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वी अमित ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आदित्य ठाकरे यांनी 'शिवतीर्थ'वर जाऊन शुभेच्छा दिल्या होत्या.

# पुणे पोलीस कुणाच्या चावीवर चालतात? १५६ पैकी ७८ जणांना का सोडले?

**रेव्ह पार्टीवरून रोहिणी खडसे संतापल्या**

■ पुणे

**पुण्याजवळच्या** तुळापूर येथे झालेल्या रेव्ह पार्टीवरून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी म्हटले की, प्रत्यक्षात १५६ जण या पार्टीत सहभागी असताना फक्त ७८ जणांवरच गुन्हा दाखल का करण्यात आला, उर्वरित ७८ जणांना का सोडण्यात आले, असा सवाल त्यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर बोलताना खडसे म्हणाल्या की, प्रांजल यांच्या प्रकरणात चार-पाच लोक एकत्र जमले होते, त्यालाच पुणे पोलिसांनी 'रेव्ह पार्टी'चे नाव दिले होते. आता १५६ लोक सापडले, तरी त्याला 'हाऊस पार्टी' म्हणत आहेत. प्रांजल यांच्यासह सर्वांना ताब्यात घेण्यात आले होते आणि सर्वांची टेस्ट करण्यात आली होती. मग आता पुणे पोलिसांनी १५६ लोकांपैकी इतर ७८ लोकांवर इतकी मेहेरबानी का दाखवली? फक्त ७८ लोकांवरच कारवाई का करण्यात आली? फक्त २९ लोकांचीच चाचणी का करण्यात आली? यातून पुणे पोलिसांचा दुटप्पीपणा दिसून येतो. इतर लोकांना सोडण्यात आले, ते काय आमदार-खासदारांची मुले होती का? की काही हाय-प्रोफाइल लोक होते, जे सरकारला मदत करतात? पोलीस सांगत आहेत की, या पार्टीसाठी परवानगी घेण्यात आली होती, त्या परवानगीचा साधा कागदही दाखवला जात नाही. अद्याप कारवाईचा कोणताही व्हिडिओ समोर आलेला नाही.

# गुंतवणुकीची चाचपणी करण्यासाठी युरोपचे शिष्टमंडळ आसाममध्ये दाखल

■ गुवाहाटी

**युरोपीय** समुदाय भारताच्या इशान्येकडील राज्यांसोबत दीर्घकालीन गुंतवणूक भागीदारी करण्याच्या विचारात आहे. त्याची चाचपणी करण्यासाठी आज युरोपीय समुदायाच्या वतीने शिष्टमंडळ आसाममध्ये दाखल झाले आहे.

युरोपीय समुदायाचा मुख्य भर पर्यावरणस्नेही वीजनिर्मिती, सेमीकंडक्टर निर्मिती, औषधनिर्मिती, चहा आणि शेती मालावर प्रक्रिया उद्योग यांवर असणार आहे.

आज आणि उद्या असे दोन दिवस हे शिष्टमंडळ भारतात असणार आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालंड, सिक्कीम आणि त्रिपुरा या इशान्येकडील राज्यांमध्ये युरोपीय समुदाय मोठ्या प्रमाणावर दीर्घकालीन गुंतवणूक करणार आहे.

# ट्रॅकमन कामगारांसाठी मनसेचे सीएसएमटी स्थानकात आंदोलन

■ मुंबई

**बडनेरा** वर्कशॉपमधील पात्र ट्रॅकमन कामगारांना तत्काळ कामावर रुजू करून घेण्याच्या मागणीसाठी मनसेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे आंदोलन केले. या आंदोलनात मनसे कार्यकर्ते आणि ट्रॅकमन कामगार सहभागी झाले होते.

आंदोलक म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी बडनेरा वर्कशॉपसाठी काही जागांची निवड प्रक्रिया पार पडली होती. त्यात पात्र ठरलेल्या ट्रॅकमनना गेल्या दोन वर्षांपासून केवळ आश्वासने देऊन या कामगारांची दिशाभूल केली जात आहे. अनेक वेळा निवेदने देऊन, मोर्चे काढूनही रेल्वे प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. आमचे ट्रॅकमन बांधव दोन वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करत आहेत. मात्र रेल्वे प्रशासन हा विषय सतत लांबणीवर टाकत असून त्यांच्या भविष्याशी खेळ करत आहेत. त्यामुळेच मनसेच्या नेतृत्वाखाली त्यांनी आता उपोषणाचा मार्ग अवलंबला. याशिवाय महिला ट्रॅकमनच्या प्रश्नाकडेही आंदोलकांनी लक्ष वेधले आहे. देशभरात महिलांच्या सन्मानासाठी विविध घोषणा केल्या जात असताना, मुंबईसारख्या शहरात अद्याप महिला ट्रॅकमन कॅडरमध्ये बदल न होणे ही लाजिरवाणी बाब आहे.


# नवाकाळ शब्दकोडे-१६३१

**आडवे शब्द –**

२. अंधारात चमकणारा किडा ४. पत्नी ५. या झाडापासून कात मिळतो ७. तलाव, तळे १०. वादळ, वावटळ ११. बहाणा, निमित्त १३. सोन्याचांदीच्या दुकानांची पेठ १५. सौख्य, संतोष १६. रक्ताचा रंग १७. लग्नातली मिरवणूक १८. अनेक कौशल्ये अंगी असलेला २०. चहाडी, चुगली २४. आंबटगोड पातळ भाजी २५. झाडाचे पान २६. पावसाळ्याच्या सुरुवातीला पेरणी होणारी पिके २८. लेंगा २९. भरमसाट ३१. पागेवरील अधिकारी ३३. गरीब ३५. अर्धी ओंजळ ३७. पेठ, आळी, मोहल्ला ३९. एखादे काम अकारण रखडणे ४०. दह्याचे पातळ पेय ४१. फोडणीतला एक पदार्थ, राई ४३. शांतवन ४४. पुरस्कार ४५. वरणाची डाळ ४६. उचल, आगाऊ दिलेली रक्कम ४८. जमिनीखालचा रस्ता ४९. गुरुद्वारातले अन्नछत्र ५०. खोंड, गोऱ्हा; शेतातली झोपडी ५१. कनवट ५३. रव्याचा न्याहारीतला पदार्थ ५४. असंबद्ध, विजोड ५५. क्रिकेटच्या संघात प्रत्यक्ष खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या ५८. इच्छा, मनीषा ५९. आजारी माणसासाठी तांदळाचा पातळ पदार्थ ६०. सह, बरोबर ६१. लोकरीचे वस्त्र ६२. अभिप्रेत नसलेला, चुकीचा ६३. प्राण नेणारा देव ६५. चलती, उत्कर्ष ६८. काक पक्षी ६९. निराश ७०. गव्हाच्या चिकापासून केलेला वाळवणाचा पदार्थ ७१. नक्षत्रफूल, पांढरफुली ७३. समुदाय७६. बोलबच्चन ७८. पोबारा, पलायन ७९. वस्त्र ८०. गाण्याची तान ८२. महिना ८४. शस्त्राची तीक्ष्ण कड ८५. निर्धार, प्रतिज्ञा ८६. पुरुषांचा एक कंठालंकार ८७. अंत, मर्यादा ९०. आधीच्या भूमिकेपासून पूर्ण फारकत घेणे, ९२. झाडाचा बुंधा ९३. खोटे बोलणे ९४. पाषाण ९५. नारिंगी रेषा असलेले पांढरे फूल, हे गोवा-कर्नाटकात गजऱ्यात वापरले जाते ९६. निधन ९७. सुगंधी तांदूळ ९८. उशीर १००. त्वरित १०१. त्रास देणे १०२. महत्त्व, मिजास १०३. घोडागाडी १०४. संप्रदाय

**उभे शब्द –**

१. अजोड २. करंजी ३. विल्हेवाट ४. धातूची सळई ५. दान ६. कच्चा मजकूर, खर्डा ७. जुगार ८. राजाचा प्रधान ९. वाणीचा मुख्य प्रकार, इतरांना ऐकू येईल असे बोलणे १२. ताकद १३. गोखरू १४. बाजू १५. बधीर, निःशब्द १८. सावकाश १९. वरिष्ठांची हांजी हांजी २०. श्रवणेंद्रिय



२१. न शिजलेला टचटचीत दाणा; ठोंब्या २२. दोन डोंगरांच्या मधला भाग २३. पदावरून खाली उतरणे, सत्ता सोडणे २४. असीम २५. पारतंत्र्य २६. मसाल्याच्या पदार्थातील एक, अनारशावर वापरतात २७. परंपरेने चालत आलेले ३०. सर्दी ३१. पलीकडे ३२. चांगल्यावाईटाची पारख ३४. लहान मुलांचा अबोला ३६. नाष्ट्यातला त्रिकोणी तिखट पदार्थ ३८. पक्का, दृढ ४२. जाडयाभरड्या कापडाचा प्रकार ४४. सुगरण पक्षी ४६. तांबूल ४७. एकाकी पडणे ४८. बाहू ४९. बनारसचा आंबा ५०. एकमेव द्रवरूप धातू ५२. डोके ५३. संध्याकाळ ५५. प्रतिबंध, विरोध ५६. धोतराचा उंची प्रकार ५७. लहान मुलांची टोळी ५९. कोहळ्याची मिठाई ६०. XXXX XX कुंपणापर्यंत (एक म्हण) ६४. चिलट ६५. सुंदर, चांगला ६६. जेवणाचे ताट ६७. जळाऊ लाकूडफाटा ७२. भीड, रदबदली ७३. कृश ७४. मिठाईचा प्रकार ७५. खूप घाम आलेला ७७. पराक्रमी ८१. झाडूचा प्रकार ८३. तद्रूप ८५. प्रतिध्वनी ८६. पार्किन्सन्स ८८. एक ज्वालाग्राही पदार्थ ८९. स्वर्गातून गंगा आणणारा ९१. माहितगार, ज्ञानी ९२. फावडे ९४. कर्नाटक-तमिळनाडूची मोठी नदी ९७. जगणे ९९. शैली १००. फ्रॉक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३० चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अबलख ४. वरकस ७. कहार ९. रिवाज १२. समृद्ध १३. लक्षण १५. मंदवासर १८. सल १९. माता २१. रवसड २२. चीर २३. रुळलेला २५. नुकसान २७. पतन २९. दंभ ३०. रजनी ३२. हरपररेवडी ३४. डावली ३६. रविकर ३७. सखा ३८. झोका ३९. नक्षा ४०. पथक ४१. कामगार ४३. बच्चा ४४. समता ४५. विळी ४६. मराळ ४७. शीतल ४८. साप ४९. रंधा ५०. झरा ५१. भरत ५३. स्तबक ५६. आज्ञा ५७. हिमनगजा ५९. रडारड ६१. गुपचूप ६२. खांडसरी ६४. धड ६५. कोबी ६६. लाट ६७. कबाब ६९. मारीच ७१. अत्याचार ७३. तमारी ७४. माज ७५. रिपू ७७. जाग ७९. गिऱ्हाईक ८०. तसे ८१. निब ८२. सावधगिरी ८५. साध्य ८६. वपा ८८. मशाल ८९. वृकोदर ९१. बनारी ९३. काकडा ९४. क्षय ९५. दाह ९७. चकमक ९९. वसाहत १०२. ताम्हन १०३. पाणचक्की १०४. नवीन १०४. नरमाई

**उभे शब्द :** १. अमृतानुभव २. बद्ध ३. खल ४. वणवण ५. कमंडलू ६. सद ७. कसर ८. हार १०. वासलात ११. जल १२. समा १४. क्षर १६. वाचीवीर १७. डाळ २०. पसार २३. रूपरेखा २४. लेपडी २६. नजर २८. नलिकाकूप २९. दंडा ३१. नाविक ३२. हरकारा ३३. रसरशीत ३५. लीनता ३६. रथ ४०. पळी ४२. मळभ ४३. बलराम ४४. सविस्तर ४५. विधाता ४८. सारंगधर ५०. झटपट ५२. रगड ५४. बडा ५५. करकोचा ५६. आपकमाई ५७. हिरीरी ५८. जाड ६०. डबीर ६१. गुलाब ६२. खांब ६३. समाजसेवक ६८. बारीकसारीक ७०. चरित्र ७१. अज्ञानवृक्ष ७२. त्याग ७३. तऱ्हा ७४. मात ७६. मुबलक ७८. बंध ७९. गिरी ८१. निशा ८२. साद ८३. वरदान ८४. गिल्ला ८७. पाडाव ८८. मनोहर ९०. कोयता ९२. नाचक्की ९३. काकवी ९६. आण ९८. मन १००. सान १०१. तमा

## नीट प्रश्नपत्रिका तयार करणारे २१ जूनपर्यंत लॉकडाऊनमध्ये

पान १ वरून

प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व तज्ज्ञांचा बाहेरील जगाशी संपर्क पूर्णपणे तोडला आहे. त्यांचे मोबाईल फोन, लॅपटॉप, स्मार्टवॉच आणि इतर संवाद साधने जप्त केली आहेत. इंटरनेट वापरावर बंदी घातली असून, परिसरातील येण्या-जाण्यावरही कडक नियंत्रण ठेवले आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रश्नपत्रिका तयार करणे, भाषांतर, संपादन आणि परीक्षण या प्रक्रियांमध्ये सहभागी असलेले कर्मचारी २४ तास देखरेखीखाली आहेत. पुनर्परीक्षा पूर्ण होईपर्यंत ही व्यवस्था कायम राहणार आहे.

प्रश्नपत्रिकेची गोपनीयता राखण्यासाठी एनटीएने बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू केली आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई, साठवणूक आणि वितरण या प्रत्येक टप्प्यावर कडेकोट सुरक्षा ठेवण्यात आली असून, कोणालाही संपूर्ण प्रक्रियेची माहिती मिळणार नाही याची खबरदारी घेतली आहे. तसेच प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी उच्च-सुरक्षा यंत्रणांचा वापर करण्याचाही विचार सुरू आहे. दरम्यान, पुनर्परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या समाजमाध्यमांवरील अफवा एनटीएने फेटाळून लावल्या. अशा दाव्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत चुकीची माहिती पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला.

## 'एनएसयुआय'च्या याचिकेवर सीबीएसईला कोर्टाची नोटीस

पान १ वरून

मांडली. त्यानंतर सीबीएसईचे वकील एम. ए. नियाझी यांनी न्यायालयात सांगितले की, मंडळ विद्यार्थ्यांच्या तक्रारींवर काम करत असून, पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठीची मुदत अनेक वेळा वाढवली आहे. उच्च न्यायालयाने सीबीएसईचा प्राथमिक आक्षेप नोंदवून घेतला असला तरी याचिकेची दखल घेत मंडळाला नोटीस बजावली. या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ जून रोजी होणार आहे.

## 'इंडिया' आघाडीच्या बैठकीत ५ मुद्यांवर एकमत

पान १ वरून

तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी केली आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमध्ये समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी आता दर दोन महिन्यांनी सर्व नेते एकत्र येतील. आघाडीची पुढील बैठक ८ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे होणार आहे. संसदेच्या आगामी अधिवेशनात सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन सरकारला विविध मुद्यांवर धारेवर धरतील.

इंडिया आघाडीच्या दोन वर्षांनंतर झालेल्या सातव्या बैठकीत आज २५ पक्षांचे नेते सहभागी झाले. दिल्लीत झालेल्या या बैठकीत उद्धव ठाकरे आणि हेमंत सोरेन हे ऑनलाईन सहभागी झाले, तर सोनिया गांधी, राहुल गणाधी, ममता बनर्जी, मल्लिकार्जुन खरगे, अखिलेश यादव, कपिल सिब्बल, सुप्रिया सुळे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. तामिळनाडूतील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे द्रमुक आणि पंजाबमधील नाराजीमुळे 'आप' या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत.

या बैठकीपूर्वी विरोधी पक्षनेते राहुल गांधींवर टीका करणारे अनेक फलक दिल्लीत झळकले. विशेष म्हणजे हे फलक इंडिया आघाडीतील नेत्यांच्याच नावाने लावण्यात आले होते. शरद पवार, ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन, केजरीवाल या नेत्यांचे फोटो फलकावर लावून राहुल गांधींवर टीका करण्यात आली. या नेत्यांच्या फोटोसह राहुल गांधींवरील टीकेची जुनी वक्तव्य फलकांवर लिहीण्यात आली होती. मात्र नंतर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ती पोस्टर्स फाडून टाकली.

## दिल्लीतील ५०० मोठे राष्ट्रध्वज तात्पुरते उतरवण्याचा निर्णय

नवी दिल्ली

**दिल्लीतील** सर्व ५०० मोठे राष्ट्रध्वज तात्पुरते उतरवण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला. कारण वादळी वाऱ्यासह पावसामुळे दिल्लीतील अनेक राष्ट्रध्वजांचे नुकसान झाले आहे. राष्ट्रध्वजांचा सन्मान अबाधित राहावा म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. हवामान विभागाचा वादळाचा इशारा संपल्यानंतर आणि परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर हे सर्व राष्ट्रध्वज पुन्हा आदराने फडकावण्यात येणार आहेत. सर्व राष्ट्रध्वज २०२२ मध्ये दिल्ली सरकारच्या 'देशभक्ती बजेट' अंतर्गत उभारण्यात आले होते. हे राष्ट्रध्वज प्रामुख्याने पॉलिएस्टरचे बनवलेले आहेत. तरीही त्यांचे अतिवाऱ्यामुळे नुकसान झाले आहे. या झेंड्यांच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी स्वयंसेवकांच्या 'तिरंगा सन्मान समित्या' देखील गठीत करण्यात आल्या आहेत.

## राज्यसभा उमेदवारीवरून भुजबळांची रवंत

पान १ वरून

या निर्णयामुळे भुजबळ नाराज असल्याची चर्चा होती. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी आज सकाळीच त्यांच्या 'सातपुडा' या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्यानंतर भुजबळ आणि पटेल एकाच गाडीतून विधान भवनात दाखल झाले. भुजबळ विधान भवनात पोहोचताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार राजेंद्र जैन यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्या पाया पडून आशीर्वाद घेतले आणि नंतर नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी मार्गस्थ झाले. यानंतर राजेंद्र जैन यांनी अधिकृतपणे आपला उमेदवारी अर्ज सादर केला. अर्ज दाखल करताना राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, मंत्री छगन भुजबळ, खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते दिलीप वळसे-पाटील, खासदार पार्थ पवार, मंत्री आशिष शेलार तसेच मंत्री भरत गोगावले उपस्थित होते.

जैन यांच्याविरोधात एकही अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. राजेंद्र जैन यांनी अर्ज दाखल केल्यानंतर मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, माझीही मागणी होती की, माझ्या मुलाला मंत्रिपद द्यावे आणि मी राज्यसभेवर जावे. मात्र हा प्रस्ताव वरपर्यंत पोहोचायला वेळ लागला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत भाजपाकडे प्रस्ताव मांडल्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी विचार करू, असे सांगण्यात आले आहे. भाजपाने नकार दिला, यात तथ्य नाही. मी नाराज नाही. इतर मकरंद पाटील, सुनेत्राताई, तटकरे नेते जसे वर किंवा खाली मंत्री वा खासदार आहेत, सोबतच त्यांची मुलेही मंत्रिपदी किंवा वर लोकसभा, राज्यसभेत आहेत, तसाच न्याय मला मिळावा अशी माझी मागणी होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन करण्यापासून मी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे मला देखील तोच न्याय मिळावा, अशी अपेक्षा आहे.

**नवी मुंबई को-ऑप. बँक लि.**
**NAVI MUMBAI CO-OP. BANK LTD.**
मुख्यालय : ब्लॉक नं. टी ४० ते टी ४६, दाना बाझार, सेक्टर-१९ बी, ए.पी.एम.सी, वाशी, नवी मुंबई, फोन नं. ०२२ २७८३२९४५/४६

**ग्राहकांसाठी जाहीर सुचना**

प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग (PML) कायदा आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, बँकेतील सर्व खातेदारांनी बँकेने वेळोवेळी मागणी केल्यावर Know Your Customer (KYC) दस्तऐवज अद्यावत करणे बंधनकारक आहे. त्यानुसार, ज्यांनी अद्याप (KYC) अद्यावत केलेली नाही अशा सर्व खातेदारांनी आपल्या शाखेशी तात्काळ संपर्क साधावा व ओळखपत्र पत्याचा पुरावा असलेले दस्तऐवज (सध्याचा पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन परवाना, पासपोर्ट इत्यादी) सादर करावेत. बँक सध्या (KYC) पुनरावलोकन प्रक्रिया तसेच जुन्या व निष्क्रिय (Inopertative) बचत / चालू खातेधारकांशी संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याची प्रक्रिया राबवित आहे.

बचत खाते अथवा चालू खात्यात सलग दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत खातेदाराकडून कोणताही आर्थिक व्यवहार झाला नसल्यास संबंधित खाते निष्क्रिय (Inoperative) म्हणून वर्गीकृत करण्यात येईल. असे खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी खातेदाराने अद्यावत के.वाय.सी. (KYC) कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

बँकेने असक्रिय/निष्क्रिय (Dormant)/दावा न केलेली खाती (Unclaimed/In-operative) व ज्या खात्यात शून्य शिल्लक आहेत अशा खात्यांची यादी तयार केली आहे. सदर यादी शाखांमध्ये उपलब्ध असून बँकेच्या संकेतस्थळावर www.nmcbnk.bank.in उपलब्ध आहे.

खातेदारांना उत्तम सेवा देण्याच्या दृष्टीने ज्या खातेदारांचे खाते असक्रिय/निष्क्रिय आहे किंवा ज्या खात्यात शून्य शिल्लक आहे, त्यांनी ३० दिवसांच्या आत संबंधित/जवळच्या शाखेशी संपर्क साधून आवश्यक (KYC) दस्तऐवजांसह खाते चालू करण्यासाठी कार्यवाही करावी.

महत्वाची सूचना :

जर असक्रिय / निष्क्रिय / दावा न केलेल्या खातेदारांनी ३० दिवसांच्या आत (KYC) अद्यावत न केल्यास किंवा बँकेशी संपर्क साधला नाही, तर बँकेने सदर खाते बंद करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तथापि, असे ग्राहक नवीन खाते उघडू शकतात, परंतु त्यासाठी केवायसी ((KYC) प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहील.

महाव्यवस्थापक

**TENDER NOTICE**
**VENKATESH KIRTI CHSL**
Situated At Balaji Complex,
150 Feet Road, Near Flyover Bridge,
Bhayandar (west)- 401101

Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.
Tender can be collected from Consultant Office
From: 09/06/2026 to 13/06/2026
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission on 14/06/2026 (up to 5.00 PM)
at VENKATESH KIRTI CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT. LTD.
Consulting Engineers
Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East)
Tel. Office. 98208 18155

Tender Cost Rs. 5,000/- (Non-Refundable)

**सार्वजनिक सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, अंधेरी आशियाना एस.आर.ए. सह. गृह. संस्था मर्या., पत्ता – सुबा गॅलेक्सी हॉटेलच्या मागे, ना. सी. फडके मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६९, येथील इमारतीच्या 'बी' विंगमधील मजल्यावरील सदनिका क्र. २०७ संदर्भात, विकासक मेसर्स शफा कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी श्रीमती बिलकिसबानो हसन शेख (उर्फ शेख बिलकिसबानू हसन) (उर्फ शेख बिलकिस बानू हसन) यांच्या नावे दिनांक ०९/०४/२००५ रोजी जारी केलेले ताबा पत्र हरवले / गहाळ झाले आहे.

सदर ताबा पत्र हरविल्याबाबत श्रीमती बिलकिसबानो हसन शेख (उर्फ शेख बिलकिसबानू हसन) (उर्फ शेख बिलकिस बानू हसन) यांनी अंधेरी पोलीस ठाणे येथे दिनांक २६/०५/२०२६ रोजी हरविल्याची नोंद क्र. ६९६६३/२०२६ अंतर्गत तक्रार नोंदविली आहे.

सदर हरवलेले ताबा पत्र कोणास मिळाल्यास त्यांनी ते खाली नमूद केलेल्या पत्त्यावर संस्थेकडे सदर सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत जमा करावे. तसेच, सदर ताबा पत्रासंदर्भात कोणत्याही व्यक्तीस कोणताही हक्क, दावा, मालकी हक्क, स्वारस्य, आक्षेप अथवा इतर कोणताही दावा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी माहिती आवश्यक पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर संस्थेकडे वर नमूद केलेल्या कालावधीत नोंदवावा.

निर्धारित मुदतीत कोणताही दावा, आक्षेप किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर ताबा पत्राबाबत कोणाचाही दावा नसल्याचे गृहीत धरून संस्था पुढील आवश्यक कार्यवाही करण्यास मोकळी राहील आणि त्याबाबत कोणत्याही व्यक्तीची जबाबदारी राहणार नाही.

दिनांक : ०९/०६/२०२६
अंधेरी आशियाना एस.आर.ए. सह. गृह. संस्था मर्या.,
सही/-
अध्यक्ष/सचिव
सुबा गॅलेक्सी हॉटेलच्या मागे, ना. सी. फडके मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६९

## दोन महिन्यांनंतर युद्ध पुन्हा भडकले

पान १ वरून – तसेच इस्फहान आणि तब्रीझसह अनेक शहरांमध्ये जोरदार स्फोटांचे आवाज ऐकू आले. तेहरानमधीलमेहराबाद आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातही स्फोट झाले. या कारवाईपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना इराणविरुद्ध प्रतिहल्ला टाळण्याचे आवाहन केले होते. या प्रदेशातील सर्व निर्णय मी घेतो, असे ट्रम्प यांनी म्हटल्याचे वृत्त आहे. या ताज्या तणावाचे केंद्र लेबनॉन आहे. लेबनॉनमधील इस्त्रायली कारवाया थांबविल्याशिवाय कोणताही व्यापक शांतता करार होऊ शकत नाही, अशी भूमिका इराणने वारंवार मांडली आहे. दुसरीकडे, इस्त्रायलने हिजबुल्लाह विरोधातील कारवाया इराणबरोबरच्या चर्चांपासून वेगळ्या मानल्या पाहिजेत, असे स्पष्ट केले आहे. या संघर्षामुळे जागतिक तेलबाजारातही अस्थिरता निर्माण झाली असून, कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल २ डॉलरहून अधिक वाढल्या आहेत. ब्रेंट क्रूडचे दर पुन्हा ९६ डॉलर प्रति बॅरलच्या वर गेले आहेत. दरम्यान, अमेरिकेचे मध्यस्थी प्रयत्न सुरू असून, इराण व अमेरिकेदरम्यानच्या शांतता चर्चांवर या ताज्या संघर्षाचा परिणाम होणार नसल्याचा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. मात्र इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी अमेरिकन तळ व इस्त्रायली मालमत्तांवर हल्ले करण्याचा इशारा दिला आहे. इराण-इस्त्रायल संघर्षाच्या नव्या टप्प्यामुळे मध्य पूर्वेतील तणाव पुन्हा वाढला असून, आगामी काळात परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## खासगी पाणी टँकर संघटनेचा संप सुरू

पान १ वरून – प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करण्याबाबत टँकर चालक व मालकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या कारवाईविरोधात टँकर असोसिएशनने संताप व्यक्त करत संपाचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीही मागील वर्षी याच कारणावरून पाच दिवसांचा संप करण्यात आला होता. नवीन नियमानुसार विहिरी आणि कूपनलिकांमधून पाणी उपसा करण्यापूर्वी केंद्रीय भूजल प्राधिकरणाची ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अनेक विहीरधारक आणि टँकर व्यावसायिकांकडून या नियमांचे पालन होत नसल्याने प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे. त्यामुळे टँकर व्यावसायिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या संदर्भात मुलुंड येथे तहसीलदारांसोबत बैठक झाली होती. मात्र ती निष्फळ ठरली. उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी भेट न दिल्यानेही टँकर संघटना नाराज आहे. मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर बैठक घेऊन या प्रश्नावर मार्ग काढावा, अशी मागणी मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने त्यांना पत्र पाठवून केली आहे. तोपर्यंत संप सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुंबईत सध्या सुमारे अडीच ते तीन हजार खासगी पाणी टँकर कार्यरत असून, दररोज सुमारे ३५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. बांधकाम प्रकल्प, गृहनिर्माण सोसायट्या, हॉटेल, खासगी रुग्णालये, रेल्वे, सुलभ शौचालये, सलून व कार्यालये यांचा मोठ्या प्रमाणावर टँकर पाण्यावर आधार आहे. त्यामुळे या संपाचा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होणार आहे.

**जाहीर सूचना**

सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांच्या सूचनेनुसार, मी **श्रीमती कॅरोलिन रोलियन फर्नांडिस आणि श्री. रोलियन थॉमस फर्नांडिस** (संयुक्तपणे **विद्यमान मालक** म्हणून संदर्भित) हे खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (**मालमत्ता**) एकमेव व संपूर्ण मालक असल्याचा दावा करीत आहेत, माझ्या अशिलांकडून सदर मालमत्ता खरेदी करण्याचा प्रस्तावित व्यवहार असल्यामुळे यांच्या शिर्षकाची चौकशी व पडताळणी करीत आहे.

कोणा व्यक्तिस सदर मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, देवाण-घेवाण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, अभिहस्तांकन, वाटप, गहाण, शुल्क, धारणाधिकार, करारातील बंधन, मुक्तता, हकत्याग, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, सुखाधिकार, ट्रस्ट, वहिवाट, उपवहिवाट, लीव्ह अँड लायसन्स, काळजीवाहू तत्त्वावरील ताबा, व्यवसाय, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, करार, विकास हक्क, मालकी हक्क कागदपत्रांच्या ठेवस्मरणपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, आक्षेप, हक्क, शिर्षक, लाभ, हितसंबंध, आणि/किंवा मागणी असल्यास, त्यांनी त्यासंबंधित सर्व दस्तऐवजी पुराव्यांसह आपला दावा/आक्षेप या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोलिखितांकडे लेखी स्वरूपात सादर करावा, अन्यथा, अशा व्यक्तीचा कोणताही हक्क, शिर्षक, दावा, आक्षेप, हितसंबंध आणि/किंवा मागणी त्यागलेली आणि/किंवा सोडून दिलेली मानली जाईल व त्यानुसार प्रस्तावित व्यवहार पुढे राबविण्यात येईल.

**येथे वर संदर्भित अनुसूची**
(मालमत्तेचे तपशिल)

(१) निवासी फ्लॅट क्र. ८५, तळमजल्यावर, आय-विंग, मोजमाप सुमारे ४९७ चौ. फूट कार्पेट क्षेत्रफळ (**फ्लॅट**), सरला को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. (**इमारत**), माणिक मोती, पंच मार्ग, यारी रोड जवळ, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००६१ येथे स्थित असून, गाव वर्सोवा येथील सी.टी.एस.क्र. ११२४/बी मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्याच्या हद्दीत;

(२) सरला को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. यांनी जारी केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र. १३४ मध्ये समाविष्ट असलेले (**शेअर्स**), प्रत्येकी रु.५०/- (रुपये पन्नास फक्त) चे, अनुक्रमांक ४२१ ते ४२५ (दोन्ही समाविष्ट) असलेले ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले शेअर्स; आणि

(३) सदर फ्लॅटशी संलग्न असलेली, वरील इमारतीमधील एक कार पार्किंग जागा (**कार पार्किंग जागा**).

दिनांक: ०९.०६.२०२६
ठिकाण: मुंबई
सही/-
**श्री. रोहित वसंत शिंदे**
वकील मुंबई उच्च न्यायालय,
द्वारा- मुकेश एच. जैन, कार्यालय क्र. ११८ए, १ला मजला,
नारायण उद्योग भवन, चिवडा गल्ली, लालबाग, मुंबई – ४०००१२.

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN TO PUBLIC AT LARGE that my client "M/s. Trrishan Enterprises" a partnership firm registered under Indian Partnership Act, 1932 having registered address at 601, Dilrag Apartment, 9th Road, J. V. P. D. Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai, Maharashtra 400049 intends to purchase landed property more particularly mentioned in the schedule hereunder from M/s. Prakhhyat Land Developers Pvt. Ltd., having registered office at 405, 406 Centrum Commercial & I. T. Building, 4th Floor, Opp. Railadevi Talao, Wagle Estate, Thane - 400604.

The property proposed to be purchased consists of an area admeasuring 8059.99 Sq. Mtrs. (equivalent to 86,759.34 Sq. Ft.), forming part of land bearing Survey Nos. 65/4, 66/13, 67/1, 71/4, 72/1/A, 72/2 and 72/3, situated at Village Kurund, Taluka Bhiwandi, District Thane, being part of "Plot No. 12 C". The said property is presently in the possession and occupation of M/s. Prakhhyat Land Developers Pvt. Ltd. under the registered documents more particularly described here in below :-

| Survey Nos. | Details of documents |
|---|---|
| 65/4 | Development Agreement dated 03/02/2023 registered under Doc No. BWD-1-1747-2023 |
| 66/13 | Development Agreement dated 03/02/2023 registered under Doc No. BWD-1-1747-2023 |
| 67/1 | Deed of Conveyance dated 18/02/2009 registered under Doc No. BWD-1-1085-2009 |
| 71/4 | Development Agreement dated 25/09/2023 registered under Doc No. BWD-1-13567-2023 and Sale Deed dated 25/09/2023 registered under Doc No. BWD-1-13569-2023 |
| 72/1/A | Agreement For Sale dated 30.03.2023 registered under Doc No. BWD-2-4487-2023 |
| 72/2 | Deed of Conveyance dated 18/02/2009 registered under Doc No. BWD-1-1085-2009 |
| 72/3 | Deed of Conveyance dated 18/02/2009 registered under Doc No. BWD-1-1085-2009 |

All person(s), institutions, banks, financial institutions, authorities, societies, companies, or any other entity having any share, right, title, benefit, interest, claim, objections & demands in respect of the said Property or any part thereof by way of sale, exchange, assignment, mortgage, charge, gift, trust, inheritance, occupation, possession, tenancy, sub-tenancy, leave and license, caretaker basis, lease, sub-lease, lien, maintenance, easement, release through any agreement, conveyance, writing, bequest, succession, family arrangement, settlement, litigation, decree, order of any court of law, contract / agreement, or encumbrance or otherwise including any acquisition proceedings, reservation, government claims, tenancy claims, adverse possession claims, rights of way, easement, lis pendens or any statutory dues howsoever are hereby requested to make the same known in writing along with documentary proof/sufficient evidence within **14 days** from the date of publication to the undersigned Advocate at the address mentioned here in below failing which, it shall be presumed that no such person has any claim, right, title or interest in the said property and the proposed transaction shall be completed without any further reference to such claims or interest which shall be deemed to have been waived for all purposes.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

All that piece and parcel of land admeasuring 8059.99 Sq. Mtrs. (Equivalent to 86,759.34 Sq. Ft.), forming part of land bearing Survey Nos. 65/4, 66/13, 67/1, 71/4, 72/1/A, 72/2 and 72/3, situated at Village Kurund, Taluka Bhiwandi, District Thane, out of total area comprised in Plot No. 12C, together with all rights, easements and appurtenances attached thereto.

**Date : 09.06.2026**
**Place : Mumbai**
Sd/-
**PARAG S. MISHRA (Advocate High Court)**
503, Vaishali Shopping Center, S. V. Road, Malad (West), Mumbai - 400067
E-mail:- psmishra.legal@gmail.com | Mobile : 9869126163 / 9004190735

नवाकाळ



# कोकरोच पार्टी ११ जूनला पुण्यात आंदोलन करणार



**पुणे -** नीट पेपर फुटीच्या मुद्यावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन केल्यानंतर कोकरोच जनता पार्टीने ११ जूनला पुणे येथे आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन सावित्रीबाई फुले विद्यापीठात संध्याकाळी ४ वाजता होणार आहे. ही माहिती कोकरोच पार्टीने एक्सवर पोस्ट करून दिली. कोकरोच पार्टीचे हे महाराष्ट्रातील पहिलेच आंदोलन आहे. दरम्यान, कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजित दीपके याने, आज पुन्हा एकदा नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे, असे आग्रही मत मांडले. ते म्हणाले की, हिंदू-मुस्लीम अजेंडा राबवून सत्ता मिळू शकेल. मात्र त्यामुळे रोजगार निर्मिती होणार नाही. आमच्या आंदोलनाची तुलना नेपाळमध्ये झालेल्या उठावाशी केली जाऊ शकत नाही. आंदोलन करणारे पाकिस्तानी नव्हते.

## उद्धव ठाकरेंसोबत दगाफटका झाला तसा आमच्यासोबतही होऊ शकतो

■ मुंबई

**प्रहार** जनशक्ती पक्षाचे नेते आणि शिंदेसेनेचे विधान परिषद आमदार बच्चू कडू यांनी महायुतीतील राजकारणावर भाष्य करताना केलेल्या एका वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांच्यासोबत दगाफटका झाला होता. त्यामुळे भविष्यात आमच्यासोबतही तशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा दावा त्यांनी केला.

बच्चू कडू म्हणाले की, २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांच्यासोबत दगाफटका झाला होता. त्यामुळे भविष्यात आमच्यासोबतही दगाफटका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाजपा स्वतंत्रपणे

**बच्चू कडूंचा दावा**

लढण्याची तयारी करत असेल तर आम्हीही त्यासाठी तयार आहोत. आमच्या मनातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच आहेत. २०२९ मध्ये त्यांना मुख्यमंत्री करण्यासाठी आम्ही राज्य पिंजून काढू. कडू यांच्या या वक्तव्यावर मंत्री उदय सामंत म्हणाले की, कडू यांनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाबाबत मागणी केली असेल तर ती वैयक्तिक आहे. मात्र ही मागणी स्वाभाविक




आहे. माझीही शिंदे मुख्यमंत्री व्हावे, अशी मागणी आहे. देवेंद्र फडणवीस व्हावे, ही जशी भाजपाची मागणी असते तशीच आमची मागणी असते. बच्चू कडू यांनी त्यांना वाटल्या त्या सूचना केल्या आहेत.

## एकनाथ शिंदेंचा दिल्ली दौरा पुन्हा ऑपरेशन टायगरची चर्चा

■ नवी दिल्ली

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीच्या निमित्ताने पुन्हा दिल्लीत आले आहेत. महिन्याभरातील हा त्यांचा दुसरा दिल्ली दौरा आहे. यावेळी त्यांना ठाकरेंच्या शिवसेनेचे काही खासदार गुपचूप भेटणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुन्हा ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू झाली आहे.

आपल्या दिल्ली दौऱ्याबद्दल शिंदे यांनी एका ओळीत माहिती दिली. पक्षाचा विस्तार करण्याबाबत राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत चर्चा झाली, असे त्यांनी सांगितले. बैठकीबद्दल बाकी तपशिल देण्याऐवजी त्यांनी इंडिया आघाडीच्या आज दिल्लीत झालेल्या बैठकीवर टीका केली. शिंदे यांचा हा दिल्ली दौरा दोन दिवसांचा असणार आहे. विशेष म्हणजे अवघ्या काही दिवसांपूर्वी म्हणजेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शिंदे यांनी असाच अत्यंत गुप्त आणि अचानक दिल्ली दौरा केला होता.



## कर्जमाफीतील त्रुटी दुरुस्त करा शरद पवार यांचा सरकारला सल्ला

■ मुंबई

**राज्यातील** शेतकरी कर्जमाफी, वादळी पावसामुळे झालेले पिकांचे नुकसानीबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेतील निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी सरकारने शेतकऱ्यांशी संवाद साधून निर्णयात आवश्यक दुरुस्ती करावी, असा सल्ला दिला.

शरद पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. सरकारचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे असे म्हणणे योग्य नाही. मात्र त्यामध्ये काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यामुळे हा निर्णय थेट फेटाळण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. लोकशाहीत सरकारने लोकांशी संवाद साधला पाहिजे. लोकांच्या अडचणी समजून घेत निर्णयात आवश्यक बदल करण्याची तयारी दाखवली पाहिजे. मुख्यमंत्री आणि देशातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून कर्जमाफीतील निकषांमध्ये सुधारणा करता येते का, यासाठी आमच्याकडून प्रयत्न केले जातील. पावसामुळे केळी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. यावर शरद पवार म्हणाले की, माझ्याकडे नुकसानाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. विशेषतः केळी आणि ऊस पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची टीम पाठवण्यात आली होती.

## एटीएममध्ये रोख रकमेची टंचाई केंद्र सरकारने अहवाल मागवला

■ नवी दिल्ली

**देशातील** लहान शहरे आणि ग्रामीण भागातील काही एटीएममध्ये रोख रकमेची कमतरता निर्माण होत असल्याचे एटीएम उद्योग संघटनेने रिझर्व्ह बँक आणि बँकिंग क्षेत्राच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर केंद्र सरकारने सर्व बँकांकडून तातडीने अहवाल मागवला आहे. मात्र, देशात चलनाचा तुटवडा नसून एटीएममध्ये रोख रक्कम उपलब्ध राहणार असल्याचे आश्वासन रिझर्व्ह बँकेने दिले आहे.

एटीएम ऑपरेटर आणि सेवा पुरवठादारांच्या संघटनेच्या म्हणण्यानुसार, मोठ्या प्रमाणात रोख रक्कम महानगरांतील म्हणजेच टियर-१ शहरांतील एटीएमकडे वळवली जात आहे. त्यामुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील काही एटीएममध्ये रोख रकमेचा तुटवडा जाणवत आहे. देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम नेटवर्कच्या बाबतीत हा प्रश्न अधिक जाणवत आहे. लहान शहरांमध्ये आणि गावांमध्ये एटीएमसाठी पुरेशी रोख रक्कम उपलब्ध होत नसल्याने अनेक ठिकाणी अडचणी निर्माण होत आहे. त्यांच्या माहितीनुसार एप्रिल २०२६ मध्ये एटीएम ऑपरेटरना आवश्यक असलेल्या रोख रकमेपैकी केवळ ५७ टक्के रक्कम मिळाली.

## मराठी चित्रपट महामंडळावर मेघराज राजेभोसलेंची पुन्हा सत्ता

**समर्थ पॅनेलचा दणदणीत विजय**

■ कोल्हापूर

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत निर्माता मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील 'समर्थ पॅनेल'ने पुन्हा एकदा एकहाती सत्ता मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महामंडळाच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी ३ जागा बिनविरोध झाल्याने उर्वरित १४ जागांसाठी थेट लढत झाली. या सर्व १४ जागांवर समर्थ पॅनेलचे उमेदवार विजयी ठरले.



समर्थ पॅनेलमधील विजयी उमेदवारांमध्ये मेघराज राजेभोसले, सुनील महाजन, दीपक कदम, अजित शिरोळे, राज काझी, सुशांत शेलार, धनाजी यमकर, सुभाष नकाशे, शरद चव्हाण, प्रवीण पाटील, चैत्राली डोंगरे, रवींद्र गावडे, गणेश गारगोटे आणि विकास तोरणे यांचा समावेश आहे. दुसरीकडे विरोधी 'चित्रकर्मी पॅनेल'ला एकही जागा जिंकता आली नाही. अभिनेते आनंद काळे, लेखक पितांबर काळे, निर्माते गणेश तळेकर, विजय शिंदे, दिग्दर्शक सतिश रणदिवे, कला दिग्दर्शक सतिश बिडकर, रणजीत जाधव यांसारख्या प्रमुख उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

## २६/११ मधील धाडसी नर्स अंजलीची शौर्यकथा पडद्यावर

■ मुंबई

२६/११ दहशतवादी हल्ल्यादरम्यान कामा रुग्णालयात २० गर्भवती महिलांचे प्राण वाचवणाऱ्या नर्स अंजली कुलथे यांची शौर्यगाथा पुन्हा चर्चेत आली आहे. अभिनेत्री कंगना रणौतच्या 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटातून ही कथा प्रेक्षकांसमोर येणार आहे.



हल्ल्याच्या रात्री कुलथे ड्युटीवर असताना दहशतवादी रुग्णालयात शिरल्याची माहिती मिळताच त्यांनी घाबरून न जाता २० गर्भवती महिलांना सुरक्षित ठिकाणी हलवले. त्यांनी लाईट बंद करून सर्वांना शांत राहण्यास सांगितले आणि मोठ्या धोक्यातही त्यांना सुरक्षित ठेवले. याचदरम्यान एका गर्भवती महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्या. डॉक्टर पोहोचू शकत नसताना कुलथे यांनीच पुढाकार घेत सुरक्षित प्रसूती घडवून आणली. दुसऱ्या दिवशी त्या महिलेला मुलगी झाली. अंजली कुलथे यांच्या या धाडसी कामगिरीचे मोठे कौतुक झाले. त्यांच्या प्रेरणादायी कथेवर आधारित 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित होणार आहे.

## पुणे-नागपूर लक्झरी बस आणि ट्रकचा समृद्धीवर भीषण अपघात! २५ जखमी

■ छत्रपती संभाजीनगर

**समृद्धी** महामार्गावर मेहकरजवळ पहाटे ४ वाजताच्या सुमारास पुण्याहून नागपूरकडे जाणाऱ्या खासगी लक्झरी बसचा समोरून येणाऱ्या ट्रकचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत २५ प्रवासी जखमी झाले. त्यापैकी ११ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

पहाटे 'बाबा ट्रॅव्हल्स'ची लक्झरी बस पुण्याहून नागपूरला प्रवास करत होती. ही बस मेहकरजवळ समोरून येणाऱ्या ट्रकला जोरदार धडकली. धडक इतकी भीषण होती की, बसचा पुढील भाग अक्षरशः चेंदामेंदा



झाला. अपघातानंतर बसमधील काही प्रवासी आत अडकून पडले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि बचाव दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी प्रवाशांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. जखमी प्रवाशांना तातडीने मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तर गंभीर जखमींपैकी ११ जणांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. इतर जखमींवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

## विशाखापट्टणममध्ये उकळते लोह अंगावर पडून ८ कामगारांचा मृत्यू

■ विशाखापट्टणम

**आंध्र प्रदेशमधील** विशाखापट्टणमच्या राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड (आरआईएनएल) च्या विझाग स्टील प्लांटमध्ये उकळते लोह (मोल्टन आयर्न) अंगावर पडून ८ कामगारांचा मृत्यू झाला. तर ६ ते ९ कामगार गंभीर भाजले असून जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले.

या प्लांटच्या स्टील मेल्टिंग शॉप आणि एसटीसी-३ हीट फॅसिलिटी विभागात १५०० ते १६०० अंश सेल्सिअस उकळते पोलाद वाहून नेणारी क्रेन व मोठी बालदी अचानक उलटली. त्यामुळे उकळते लोह कामगारांच्या अंगावर पडले. मृतांमध्ये कंपनीचे कायमस्वरूपी व कंत्राटी कामगार दोघांचाही समावेश आहे. प्लांटमध्ये एकच घबराट पसरली. सुरक्षा दल व अग्निशामक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. या तांत्रिक त्रुटीची व अपघाताच्या कारणांची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी दिले आहेत.

## पेपरफुटीची व्याख्या स्पष्ट करा संसदीय समितीचे एनटीएला निर्देश

■ नवी दिल्ली

**पेपरफुटी** झालीच नाही, असा दावा करणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेला (एनटीए) संसदीय समितीने एक प्रश्नावली पाठवली असून, पेपरफुटीची व्याख्या स्पष्ट करा, हा त्यातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

काँग्रेसचे नेते, खासदार दिग्विजय सिंह यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण, महिला, बालकल्याण, युवा आणि क्रीडा या विषयांवरील संसदीय समिती नीट पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षेतील घोटाळ्याप्रकरणी चौकशी करत आहे. गेल्या आठवड्यात एनटीएचे प्रतिनिधी संसदीय समितीसमोर हजर राहिले होते. त्यावेळी त्यांनी पेपरफुटी झाली नाही. केवळ काही संभाव्य प्रश्न सोशल मीडियावर व्हायरल झाले, असा दावा केला होता. त्यानंतर संसदीय समितीने ही प्रश्नावली पाठवली असून, सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचे निर्देश दिले आहे. २०१८ पासून एनटीएच्या कार्यकाळात एकदाही पेपरफुटी झाली नाही का, असा सवालही या प्रश्नावलीत विचारण्यात आला आहे. एनटीएकडे मनुष्यबळ किती आहे व गेल्या ३ वर्षांत एनटीएमध्ये किती अधिकारी-कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली, याची विचारणाही केली आहे.

## पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात ७८ जणांवर गुन्हा दाखल! आलिशान बंगला सील

■ पुणे

**पुणे** शहरालगतच्या तुळापूर परिसरातील एका आलिशान फार्म हाऊसवर सुरू असलेल्या हाय-प्रोफाईल 'प्रोजेक्ट एक्स' रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने काल पहाटे धडक कारवाई करत मोठा पर्दाफाश केला. या कारवाईत आयोजकांसह एकूण ७८ जणांविरोधात लोणीकंद पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून, संबंधित बंगला सील केला आहे.

पोलिसांनी सुमारे १० लाख रुपयांचे विदेशी मद्य, प्रतिबंधित हुक्का फ्लेव्हर आणि गांजाही जप्त केला. तब्बल १ कोटी ४ लाख रुपये किमतीची अत्याधुनिक डीजे साऊंड सिस्टिम जप्त करण्यात आली. एकूण सुमारे ८५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात सुमारे ३० जणांना चौकशीसाठी नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यांची सध्या चौकशी सुरू आहे.

तसेच पार्टीत सहभागी असलेल्या २३ तरुण-तरुणींचे रक्तनमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. याबाबत पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले की, अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. संबंधित तरुणांच्या पालकांनाही माहिती देऊन समुपदेशन करण्यात येणार आहे.

## विवाहपूर्व शरीरसंबंध ठेवल्याने कोणी चारित्र्यहिन ठरत नाही

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**दोन** सज्ञान स्त्री-पुरुषांमध्ये विवाहपूर्व शरीरसंबंध झाले असल्यास केवळ तेवढ्या कारणाने व्यक्ती चारित्र्यहीन ठरत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याच्या निकालादरम्यान नोंदवले.

**सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा**



गजुला तिरुपती नामक व्यक्तीने यासंबंधी याचिका दाखल केली होती. गजुला तिरुपती यांचे लग्नाच्या आधी एका तरुणीशी प्रेमसंबंध होते. पुढे त्यांच्यात वितुष्ट आले. त्यामुळे तरुणीने गजुला यांच्याविरूद्ध लग्नाचे आमिष दाखवून शरीरसंबंध ठेवल्याची तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी गजुला यांच्यावर गुन्हा नोंदवला. गजुला यांनी प्रशिक्षणार्थी पोलीस शिपाई पदासाठी अर्ज केला तेव्हा ते सर्व चाचण्या उत्तीर्ण होऊनही त्यांच्यावर फसवून शरीरसंबंध ठेवल्याचा गुन्हा नोंद असल्याचे कारण देत तेलंगणा राज्यस्तरीय पोलीस भरती मंडळाने त्यांना अपात्र ठरवले. या निर्णयाला गजुला यांनी तेलंगणा उच्च न्यायालयात आव्हान दिले असता उच्च न्यायालयाने गजुला यांचे म्हणणे रास्त असल्याचे सांगत त्यांना संधी देण्याचे निर्देश संबंधित मंडळाला दिले. त्यानंतर मंडळाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

## कामाठीपुरानंतर डोंगरी क्लस्टर पुनर्विकासावर म्हाडाची नजर! ८१ इमारतींच्या जागी ७ टॉवर्स

■ मुंबई

**कामाठीपुरा** क्लस्टर पुनर्विकास प्रकल्पाला सुरुवात करण्याची तयारी सुरू असतानाच म्हाडा म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आता दक्षिण मुंबईतील आणखी एका मोठ्या परिसराच्या पुनर्विकासासाठी सज्ज झाले आहे. उमरखाडी अर्थात डोंगरी परिसराचा



क्लस्टर पुनर्विकास करण्याचा प्राथमिक प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. ६.२३ एकर क्षेत्रफळावर हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सध्या असलेल्या ८१ जुन्या इमारती पाडून त्यांच्या जागी ४० ते ८१ मजल्यांचे सात टॉवर्स उभारले जाणार आहेत.

निविदा प्रक्रियेद्वारे बांधकाम व विकास संस्था नेमून हा प्रकल्प राबविला जाईल. २,००० हून अधिक निवासी व व्यावसायिक धारकांचे पुनर्वसन केल्यानंतर म्हाडाला १,०४१.७४ कोटी रुपयांचा नफा अपेक्षित आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात आला तर भेंडी बाजार आणि कामाठीपुरा यानंतर दक्षिण मुंबईतील हा तिसरा मोठा क्लस्टर पुनर्विकास » पान ५ वर

## नाशिकमध्ये पहिल्याच दिवशी नाफेडची कांदा खरेदी ठप्प

■ नाशिक

**केंद्र** सरकारच्या निर्णयानुसार नाशिक जिल्ह्यातील १५ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आजपासून नाफेड आणि एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी सुरू झाली. मात्र, पहिल्याच दिवशी नियुक्त संस्थांचे प्रतिनिधी बाजार समित्यांमध्ये न पोहोचल्याने खरेदी प्रक्रिया ठप्प झाली.

चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीत सकाळपासून व्यापारी आणि शेतकरी नाफेडच्या प्रतिनिधींची वाट पाहत होते. खरेदी प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी नियुक्त संस्थांच्या प्रतिनिधींसोबत बैठक होणे अपेक्षित होते. मात्र, बराच वेळ उलटल्यानंतरही कोणीही उपस्थित न राहिल्याने व्यापाऱ्यांनी नियमित कांदा लिलाव सुरू केला. त्यामुळे नाफेड किंवा एनसीसीएफकडून प्रत्यक्ष खरेदी सुरूच होऊ शकली नाही. चांदवडप्रमाणेच लासलगाव आणि अन्य काही बाजार समित्यांमध्येही अशीच परिस्थिती होती.

नाफेड किंवा एनसीसीएफचे अधिकारी नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. शासनाने मोठ्या गाजावाजात खरेदीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात यंत्रणा सज्ज नसल्याचे चित्र पहिल्याच दिवशी उघड झाले.

